दैनिक

रुबाबदार राज्याचा, जबाबदार विचार...

# लक्ष महाराष्ट्र

नाशिक, नंदुरबार, धुळे, जळगाव येथून एकाचवेळी प्रकाशित.

RNI No.MAHMAR/2019/79184

www.lakshamaharashtra.com | lakshamaha.dhule@gmail.com | lakshamaha.nsk@gmail.com

धुळे-नंदुरबार-नाशिक आवृत्ती | वर्ष ४ थे | अंक : ३१८ वा | बुधवार दि. १३ सप्टेंबर २०२३ | किंमत : २ रु. | पृष्ठे : ६

## मुंबई केंद्रशासित करण्याचा डाव: नाना पटोले यांचा आरोप



**मुंबई ।** केंद्रातील नरेंद्र मोदी सरकारने संसदेचे विशेष अधिवेशन देशाचे तुकडे करण्यासाठी बोलावले असून मुंबईला महाराष्ट्रापासून तोडून केंद्रशासित प्रदेश करण्याचा मोदी सरकारचा डाव आहे, असा गंभीर आरोप काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केला आहे. दरम्यान नाना पटोले म्हणाले की, मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी असल्याने भाजपच्या डोळ्यात खुपत आहे. आता मुंबईतील शेअर बाजार गुजरातला घेऊन जायचा डाव आहे असा गंभीर आरोप नाना पटोले यांनी केला आहे.

## न्यूज कॉलम

### चहा विक्रेत्याकडे ४७ हजारांची घरफोडी

**धुळे ।** शहरातील मनमाड जीन परिसरातील गल्ली क्रमांक सातमधील सोनदेववाडा चौकात असलेल्या चहा विक्रेत्याकडे चोरट्यांनी घरफोडी केली. कपाटातील लॉकरमधून ३० हजारांची चिल्लर, साडेचार हजार किमतीच्या अंगठ्या, तीन हजार २०० किमतीचे सोन्याचे तीन पान, चांदीचे शिक्के, तांब्याचे हंडे, पितळी पातले असा एकूण ४७ हजार किमतीचा ऐवज चोरट्यांनी लंपास केला. ही घरफोडी शुक्रवारी रात्री झाली.

### किरकोळ वादातून बाप–लेकाला मारहाण

**धुळे ।** किरकोळ वादातून बाप- लेकाला मारहाण करण्यात आल्याची घटना नंदाळे (ता. धुळे) येथे घडली. दगा महादू पाटील (वय ६५) या शेतकऱ्याने दिलेल्या फिर्यादीनुसार 'तू आम्हाला पाहून का हसलास' याचा जाब विचारल्याच्या कारणावरून भाऊसाहेब पाटील, सोनू पाटील, मच्छिंद्र पाटील, डॅनी पाटील यांनी दगा पाटील आणि राजेंद्र पाटील या दोघांना लोखंडी सळईने मारहाणीतून जखमी केले. ही घटना शनिवारी दुपारी चारला घडली. या दाखल गुन्ह्याचा हवालदार जावळे तपास करीत आहेत.

# जिल्हा परिषदेत दुष्काळ टंचाई निवारणार्थ बैठक

## खासदार डॉक्टर भामरे अन् जि.प. अध्यक्ष सौ.पाटील 'ॲक्शन मोडवर'!

### जिल्ह्यातील अडीच लक्ष शेतकऱ्यांना 'मिड सीजन' भरपाई रोख मिळणार

**धुळे । प्रतिनिधी**





यंदाच्या हंगामात पेरणीनंतर लांबलेला पाऊस आणि जिल्ह्यावरील दुष्काळाचे सावट लक्षात घेता बारा मंडळापैकी दहा मंडळांमध्ये मीड सीझन ( मध्य हंगाम) म्हणून नोंद झाली आहे. त्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील सुमारे अडीच लक्ष पीक विमाधारक शेतकऱ्यांना २५ टक्के भरपाई रक्कम रोख स्वरूपात देण्यात येणार आहे.

सदरची भरपाई रक्कम संबंधितांना तातडीने वितरित करण्याच्या सक्त सूचना धुळे जिल्ह्याचे खासदार डॉक्टर सुभाष भामरे यांनी येथील बैठकीत दिल्या. दरम्यान जिल्ह्यावरील दुष्काळाचे सावट लक्षात घेता सरपंच, ग्रामसेवक यांनी अधिक सजग राहून सामाजिक उत्तरदायित्वाच्या भूमिकेतून या प्रश्नाला न्याय द्यावा, पदाधिकारी म्हणून या संकटाला तोंड देण्यासाठी आम्ही देखील कटिबद्ध आहोत अशी ग्वाही धुळे जिल्हा परिषदेचे अध्यक्ष इंजिनिअर अश्विनीताई पाटील यांनी उपस्थित सरपंच ग्रामसेवक यांना दिली.

संभाव्य दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर पाणीटंचाई व उपाय योजना संदर्भात खासदार डॉक्टर श्री सुभाष भामरे यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवारी सकाळी जिल्हा परिषदेच्या कै. यशवंतराव चव्हाण सभागृहात तालुक्यातील सरपंच ग्रामसेवक तसेच विविध विभागाच्या अधिकाऱ्यांची संयुक्त बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस धुळे जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा इंजिनियर अश्विनी पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी शुभम गुप्ता,महिला बालकल्याण सभापती संजीवनी सिसोदे, माजी कृषी सभापती प्राध्यापक अरविंद जाधव, माजी कृषी सभापती संग्राम पाटील, जि प सदस्य श्री राम भदाणे, शालिनी भदाणे, आशुतोष पाटील आदी उपस्थित होते. यंदाच्या हंगामात पेरणीनंतर लांबलेला पाऊस आणि जिल्ह्यावरील दुष्काळाचे सावट लक्षात घेता बारा मंडळापैकी दहा मंडळांमध्ये मीठ सीजन (मध्य हंगाम) म्हणून नोंद झाली आहे. त्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील २ लक्ष ५१ हजार पीक विमाधारक शेतकऱ्यांना २५ टक्के भरपाई रक्कम रोख स्वरूपात देण्यात येणार आहे. सदरची भरपाई रक्कम संबंधितांना तातडीने वितरित करण्याच्या सक्त सूचना खा. डॉ. सुभाष भामरे यांनी यावेळी दिल्या.

### दुष्काळाचे सावट

**यावेळी सरपंच आणि ग्रामसेवकांच्या भावना ऐकून घेतल्यानंतर जिल्हा परिषदेचे अध्यक्ष इंजिनियर सौ अश्विनीताई पाटील म्हणाल्या की अल्प पर्जन्यमान झाल्यामुळे यंदाचा हंगाम धोक्यात आहे. दुष्काळाचे सावट लक्षात घेता सरपंच ग्रामसेवक यांची जबाबदारी वाढलेली आहे. त्यांनी सामाजिक उत्तरदायित्वाच्या भूमिकेतून या प्रश्नाला तोंड देण्याची गरज आहे. संभाव्य टंचाई लक्षात घेता कुणीही आपल्या कर्तव्यात कसूर करू नये. या संकटाला तोंड देण्यासाठी आपण सर्व सांघिक प्रयत्नातून सज्ज राहू या. पदाधिकारी म्हणून आम्ही सर्वजण आपल्या सोबत आहोत अशी ग्वाही देत सौ पाटील यांनी सरपंच आणि ग्रामसेवक यांचे मनोबल वाढविले.**

### टँकरने पाणीपुरवठा करावा लागण्याची शक्यता

**याप्रसंगी धुळे तालुक्यातील ३४ गावांमध्ये अल्प पर्जन्यमान विचारत घेता टँकरने पाणीपुरवठा करावा लागण्याची शक्यता आहे. या गावातील सरपंच आणि ग्रामसेवक यांनी यावेळी गावाबद्दलची सद्यस्थिती सभागृहाच्या निदर्शनास आणून दिली. तसेच विविध जलाशयांमध्ये असलेल्या शिल्लक साठा बाबत देखील यावेळी माहिती देण्यात आली. ही बाब ऐकल्यानंतर संबंधित गावांमध्ये आवश्यक त्या उपाययोजना तातडीने करणे बाबत सूचना देण्यात आल्या. जिल्ह्यावरील दुष्काळाचे सावट लक्षात घेता येणाऱ्या काळात पिण्याचे पाणी, गुरांसाठी पाण्याचे नियोजन याबाबत संबंधित अधिकाऱ्यांनी सूक्ष्म नियोजन करण्याचे आदेश खासदार डॉक्टर सुभाष भामरे यांनी दिले. पशुधनासाठी संभाव्य चारा टंचाई लक्षात घेता शेतकऱ्यांनी वैरण पिके पेरावे. त्यासाठी पशुसंवर्धन विभागामार्फत मोफत बियाणे देण्यात येतील अशी माहिती यावेळी देण्यात आली.**

# एक महिन्याचा वेळ देतो, त्यानंतर एकाही मंत्र्याला महाराष्ट्राच्या सीमेवर फिरकू देणार नाही

### मनोज जरांगे आक्रमक

**जालना । प्रतिनिधी**



मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे उपोषणाला बसले असून, त्यांच्या उपोषणाचा आजचा १५ दिवस आहे. दरम्यान आज त्यांनी महत्वाची भूमिका स्पष्ट केली आहे. सरकार एक महिन्याचा वेळ मागत आहे. उद्या त्यांनी आम्हाला वेळ दिला नसल्याचे म्हणू नये. त्यामुळे असेही पंधरा दिवस गेले असून, सरकारला आणखी एक महिन्याचा वेळ देण्यात येत आहे. त्यांनी एक महिन्यात आरक्षणाचा प्रश्न मार्गी लावला पाहिजे. मात्र, तीस दिवस संपल्यावर ३१ व्या दिवशी राज्यातील एकाही मंत्र्याला महाराष्ट्राच्या सीमेवर फिरकू देणार नाही, असा इशारा मनोज जरांगे यांनी सरकारला दिला आहे.

मराठा आरक्षण आणि मनोज जरांगे यांच्या उपोषणासंदर्भात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली सोमवारी मुंबईत बैठक पार पडली. दरम्यान या बैठकीनंतर मनोज जरांगे यांनी आपली भूमिका स्पष्ट केली आहे. मराठा आरक्षणाचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी आम्हाला एक महिन्याचा वेळ हवा आहे अशी सरकारची भूमिका आहे. त्यामुळे सरकारला एक महिन्याचा वेळ दिला पाहिजे. सरकारने या एक महिन्यात आरक्षणाचा मुद्दा मार्गी लावावा. या एक महिन्यात हा प्रश्न मार्गी न लागल्यास पुन्हा एकदा अमरण उपोषण सुरू करणार असल्याचा इशारा जरांगे यांनी दिला. तसेच एक महिन्यानंतर राज्यातील एकही मंत्र्याला महाराष्ट्राच्या सीमेवर फिरकू देणार नाही असा थेट इशाराही जरांगे यांनी दिला आहे.

सरकारला एक महिन्याचा वेळ दिला आहे. या एक महिन्यात मराठा समाजाला आरक्षण देण्याचं काम सरकारने करावं. अन्यथा पुढच्या १२ तारखेला म्हणजेच १२ ऑक्टोंबरला मराठा समाजाची एक मोठी सभा होईल. या सभेत राज्यातील प्रत्येक मराठा सहभागी होईल. देशाच्या इतिहासात कधी नव्हे अशी ही सभा होईल. मराठ्यांचा आक्रोश या निमित्ताने जगाला पाहायला मिळेल. त्यामुळे सरकारला दिलेल्या एक महिन्यात त्यांनी मराठा समाजाला आरक्षण द्यावे ही अपेक्षा असल्याचे जरांगे म्हणाले.

# दहिवेल येथे नवीन पोलीस चौकीचे भूमिपूजन सोहळा संपन्न



**दहिवेल । प्रतिनिधी**

साक्री तालुक्यातील दहिवेल येथील सुरत नागपूर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक सहा वरील चौपदरीकरण रस्त्याचे काम सुरू असल्याने ब्रिज लगत असलेली पोलीस चौकी रस्ता चौपदरीकरणाला अडथळा ठरत असल्याने सदर पोलीस चौकी दुसऱ्या जागावर स्थलांतरित करत बांधकाम सुरु आहे. पोलीस स्टेशन साक्री अंतर्गत असलेल्या दहीवेल दुरक्षेत्राचे नविन चौकीचा भूमी पूजन सोहळा संपन्न झाला.

सदर भूमिपूजन सोहळ्यास मा उपविभागीय पोलीस अधिकारी साजन सोनवणे सो यांच्या उपस्थित व साक्री पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक मोतीराम निकम यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी जि.प. सदस्य खंडू कुवर, दहिवेल गावाचे लोकनियुक्त सरपंच प्रकाश वळवी, उपसरपंच अमोल सोनवणे, वसंतराव बच्छाव भानुदास, गांगुर्डे श्रावण माळी, मनोज चौधरी, गणेश गावित, कन्हैयालाल माळी, डॉ दिनेश मराठे, संदिप बच्छाव, मनोहर बच्छाव, तुषार माळी, अंकुश बच्छाव, पवन सदाशिव,दहिवेल ग्रामपंचायत चे सर्व सदस्य उपस्थित होते व दहिवेल आउट पोस्टचे उपनिरीक्षक राजू जाधव, दिनेश मावची, संजय शिरसाठ, शांतीलाल पाटील, हे देखील उपस्थित होते. सदर बांधकामाची एकूण जागा ७०००. हजार स्केअर फुट आहे परंतु आज रोजी ६९१. स्केअर फुट बांधकाम करण्यात येत आहे असे मत एन.एच.ए.आय. च्या इंजी यशोदीप पाटील यांनी मत व्यक्त केलं आहे. या भूमिपूजन उद्घाटन कार्यक्रमाप्रसंगी दहिवेल गावातील नागरिक उपस्थित होते.

# राऊत, जाधव अन् उद्धव ठाकरे हे जोकर : चित्रा वाघ

**मुंबई । प्रतिनिधी**



विदूषकांची टोळी राज्यात फिरतेय यात पहिले नाव आहे संजय राऊत, दुसरे आहे भास्कर जाधव आणि तिसरा या दोघांचा मास्टर विदूषक उद्धव ठाकरे आहेत. उद्धव ठाकरेंकडे दुसरे काम उरले नाही म्हणून ते करमणूक करत आहेत. पण ते काम देखील त्यांना नीट जमत नाही, अशी टीका भाजप नेत्या चित्रा वाघ यांनी केली.

आमच्या नेत्यांच्या नादी लागू नका. तुम्ही आमच्या नेत्यांवर बोलाल पण यापेक्षा कडक उत्तर देऊ असा इशाराही चित्रा वाघ यांनी दिला आहे. उद्धव ठाकरे यांना गोध्रा दिसते. उद्धव ठाकरे हिंदू विरोधी झाले आता श्रीरामाबद्दल देखील ते बोलत आहेत, असा टोलाही चित्रा वाघ यांनी लगावला. ३७० कलम हटवून दाखवलं हा पुरुषार्थ आहे. पण उद्धव ठाकरे यांचा पुरुषार्थ काय तर कोविड काळात भ्रष्टाचार, पत्राचाळ घोटाळा, यात आहे असंही चित्रा वाघ यांनी म्हटलंय. काल जळगावमध्ये झालेल्या जाहीर सभेत उद्धव ठाकरे यांनी भाजपवर निशाणा साधत गंभीर आरोप केले होते. यावेळी उद्धव ठाकरे यांनी आपल्या भाषणात चार ते पाच वेळा टरबुज्या असा शब्द वापरला. मराठा आंदोलकांवर पोलिसांनी केलेल्या लाठीचार्जप्रकरणी ठाकरे यांनी 'जालियनवाला बाग' हत्याकांडाप्रमाणे कोणी तरी 'जालनावाला कांड' करु पाहतंय, सगळ्यांच्या तोंडी एकच नाव आहे. असं म्हटलं. यावेळी गर्दीतून जोरजोरात ओरडा सुरु झाला. टरबुज्यासारखा माणूस मी पाहिलेला नाही. पण तुम्ही म्हणत असाल तर ठिक आहे असं उद्धव ठाकरे यांनी म्हटलं. अशी अप्रत्यक्ष टीका त्यांनी भाजपवर तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर केली.

# चोरीच्या गुन्ह्यातील आरोपी जेरबंद



### साक्री पोलीसांची कामगिरी

**साक्री । प्रतिनिधी**

साक्री शहरातील रामजीनगर भागात झालेल्या चोरीची उकल साक्री पोलिसांनी केली आहे. साक्रीतच राहणाऱ्या चोरट्यांनी रामजी नगरात राहणाऱ्या एका महिलेच्या घरावर पाळत ठेवून दशामातेच्या कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी ती महिला गेली असता चोरट्यांनी पहाटे दोन ते तीन वाजेच्या सुमारास त्यांच्या घरातून २६ हजार रुपयांचे सोने व दीड लाख रुपये रोकड असा एकूण १ लाख ७६ हजार रुपयाचा मुद्देमाल चोरून नेला होता. स महिलेने चोरीची फिर्याद साक्री पोलीस स्टेशनला दिली होती. त्यानंतर संशयित म्हणून सदर आरोपींना ताब्यात घेतले होते. परंतु त्यावेळी सबळ पुरावा नसल्याने त्यांना सोडून देण्यात आले. मात्र त्यांच्यावर गुप्त रीतीने साक्री पोलिसांनी पाळत ठेवून व दम डाटा व लोकेशन या तंत्रज्ञानाच्या साहाय्याने त्यांना मुद्देमालासह तीन दिवसांपूर्वी ताब्यात घेतले. आरोपी रुपेश रवींद्र पवार, पवन प्रकाश जाधव सुलतान नवरा शहा शशिकांत त्र्यंबक साळुंखे विकी गुलचंद भवरे उमेश दीपक बाबर यांच्याकडून चोरी गेलेल्या १ लाख ७६ हजार रुपयाच्या मुद्देमालापैकी १६ हजार रुपये किमतीचे ७.६ ग्रॅम वजनाचे सोने व २४ हजार रुपये रोकड अशा ४० हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

दीड महिन्यापूर्वी झालेल्या चोरीचे साक्री पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक मोतीराम निकम, स.पो.नि. रोशन निकम, पोलीस उपनिरीक्षक प्रसाद रौंदळ, पोलीस कॉन्स्टेबल चेतन गोसावी, तुषार जाधव, मयूर चौधरी, धुळे एलसीबीचे पोलीस हेड कॉन्स्टेबल संजय पाटील, बापू रायते, संजय शिरसाठ, शांतीलाल पाटील यांच्या टीमने सदर चोरी उघडकीस आणली असून आरोपींना अटक केली आहे. या चोरीचा उलगडा करण्यासाठी पोलीस अधीक्षक संजय बारकुंड, अप्पर पोलीस अधीक्षक किशोर काळे, साक्री ग्रामीणचे पोलीस उपविभागीय अधिकारी साजन सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली सदर चोरीच्या गुन्ह्याची उकल करण्यात आली.

# कधीकाळी ज्या हातातून घडले होते गुन्हे, ते हात घडवताहेत गणेश मूर्ती

ज्या हातांनी कधी काळी गुन्हे घडले त्याच हातांनी या सुंदर... सुबक आणि देखण्या गणेश मूर्ती साकारल्या आहेत. धुळे जिल्हा कारागृहातल्या कैद्यांनी गणेश उत्सवानिमित्त या गणपती मुर्ती साकारल्या आहेत. या गणेशमूर्तींचे विक्री व प्रदर्शन भरविण्यात आले होते. विक्री केंद्र या ठिकाणी सामान्य नागरिकांना खरेदीसाठी या मुर्त्या ठेवण्यात आल्या आहेत. कैद्यांनी बनवलेल्या या मुर्ती सगळ्या पर्यवरणपूरक शाडू मातीच्या आहेत. मात्र या वर्षी महागाई मध्ये वाढ झाल्यामुळे यंदा गणेश मूर्ती महाग झाल्या आहेत. मात्र कारागृहातील कैद्यांनी साकारलेल्या मूर्तींच्या किमती बाजारातल्या मुर्तीपेक्षा स्वस्त आहेत. कधी काळी ज्या हाताने गुन्हा घडवला होता तेच हात आता एवढ्या सुंधर संकल्पना साकारतील कधी कैद्यांना वाटलं नव्हतं. कैद्यांच्या हाताशी काम मिळावं आणि ते वेगळ्या अजून काही उपक्रम साकाराव हाच एक उद्देश याचा मागे आहे.

कैद्यांनी बनवलेल्या वस्तूंना चांगली मागणी आहे. लोक सहसा दुकानातून अनेक वस्तू खरेदी करतात. त्यामुळे आम्ही यंदा मूर्ती बनवण्याचा विचार केला. असे देखील सांगितले.




फुलाराम नवरामजी मेघवाड या कैद्याने नाशिक रोड मध्यवर्ती कारागृहात असताना उत्कृष्ट गणपती मूर्त्या साकारून शासनास निधी मिळवून दिला होता. पुढील शिक्षा भोगण्यासाठी या बंदिवानाला धुळे कारागृहात पाठविण्यात आले आहे. त्याने त्याच्याकडील गणेश मूर्ती बनिवण्याची कला कारागृहातील बंदिवानांना शिकविण्यासाठी पुढाकार घेतला. त्यासाठी कारागृह प्रशासनानेही सर्वतोपरी सहकार्य केले. याकामी कारागृह शिपाई सूर्यकांत पाटील यांची नियुक्ती केली. त्यानुसार कैदी फुलाराम मेघवाड याने बंदिवानांना गणेशमूर्ती बनविण्याचे प्रशिक्षण दिले. त्यानुसार बंदिवान गोपाळ माधव गायकवाड, विलास लक्ष्मण कोळी, सोपान रघुनाथ काशीद व हरीष धिरूभाई पटेल यांनी शाडू मातीपासून गणपती बनविण्याची कला आत्मसात करत सुंदर अशा गणेश मूर्ती तयार केल्या. शाडू मातीपासून तयार करण्यात आलेल्या या मूर्ती पर्यावरणपुरक व आकर्षक आहेत.

### कलाकृतीचा उत्तम नमुना

**कारागृहात अनेक वर्षांपासून शेती केली जाते. यावर्षी कैद्यांना गणेशमूर्ती तयार करण्याचे प्रशिक्षण देवून त्यांच्याकडून सुंदर पर्यावरणपुरक गणेशमूर्ती तयार करुन घेतल्या. घरगुती गणेशोत्सव साजरा करण्यासाठी नागरिक पुढे येत आहे. निसर्गाला हानी पोहोचत नाही. शिवाय कैद्यांनी श्रम, कष्ट मेहनत करून या मूर्त्या तयार केल्याअसून कलाकृतीचा उत्तम आणि सुबक नमुना असल्याचे नागरिक सांगत आहे.**



### कैद्यांच्या जीवनात आशेचा किरण

**जेल प्रशासनाने अतिशय चांगला उपक्रम राबविला. कैद्यांना समाजाच्या प्रवाहात आणण्यासाठी हा उत्तम प्रयत्न आहे. कैद्यांनी तयार केलेल्या गणेशमूर्ती पर्यावरणपूरक आहेत. शहरातील नागरिकांनी देखील प्रतिसाद देणे गरजेचे आहे. जेणेकरुन मुर्तींची विक्री होवून त्याचा मोबदला कारागृह व शासनाला मिळेल. या अभिनव उपक्रमामुळे कैद्यांच्या जीवनात उत्साह व आशेचा किरण निर्माण होण्यास मोठी मदत होणार आहे.**

# कोटंबी घाटात ठाकरे गट आणि राष्ट्रवादीकडून रास्ता रोको

**पेठ । प्रतिनिधी**

प्रशासनाचा नाकर्तेपणा, रस्त्यांची दुरावस्था, टोल नाक्यावरील दंडेलशाही आणि अवैध वजन काट्यावरील लूट याच्याविरोधात शिवसेना (उबाठा) व राष्ट्रवादी यांच्या वतीने संयुक्तपणे कोटंबी घाटात तब्बल दीड तास रास्ता रोको करण्यात आला.

कोटंबी घाटातील अपघातग्रस्त वळणाची दुरुस्ती, सावळघाटात अनेक ठिकाणी रस्ता खचणे, वळणावर उखडलेला रस्ता, घाटांचे रुंदीकरण यासह रस्त्यावर अनेक समस्या असून सक्तीची टोलवसुली थांबविण्यासाठी आणि समस्यांचे निराकरण होण्यासाठी ठाकरे गटाचे भास्कर गावित यांच्या नेतृत्वाखाली हा रास्ता रोको करण्यात आला. दरम्यान, याप्रसंगी कोटंबीचे सरपंच किरण भुसारे, कुभाळेचे सरपंच मोहन कामडी, विशाल जाधव, टोल कृती समितीचे सदस्य यशवंत गावंडे, पुंडलिक महाले, राजू करपे यांच्यासह ५० ते ६० कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी तहसीलदार अनिल पुरे व पोलीस निरीक्षक व्ही.एस. देवरे यांनी आंदोलकांच्या भावना शासनापर्यंत पोहचविण्याच्या व त्यावर सुधारणा घडवून आणण्याचे अश्वासन दिले. त्यानंतर निवेदन देऊन रास्ता रोको मागे घेण्यात आला.

## साक्षरतेला आणि विवेकाला पर्याय नाही

समाजमाध्यमांचा समाजावरचा, विशेषतः युवा पिढीवरचा प्रभाव आता नवा नाही. त्यातील नावीन्य ओसरले असून त्या प्रभावातील नकारात्मकता हा आता चिंतेचा विषय आहे. त्यात भर पडू शकेल असे वृत्त माध्यमात अधूनमधून प्रसिद्ध होते. पुण्याच्या विश्रांतवाडी भागात एक घटना घडली. दक्षिण कोरियात नृत्य शिकण्यासाठी दोन शाळकरी मुली घर सोडून पळून गेल्या. दोघीही आठवीत आहेत. त्या मुली समाजमाध्यमांवरील त्या नृत्याच्या फॅन होत्या. त्यांच्या पालकांनी पोलिसात तक्रार दिली. पोलिसांनीही वेळेत तपास केला.

मुली रेल्वेने पुण्याहून मुंबईला गेल्या होत्या असे तपासात निष्पन्न झाले. दादर रेल्वे स्थानकासमोरील एका टॅक्सी चालकाला मुलींचा संशय आला. त्यानेही पोलिसांना माहिती दिली. सर्वांच्या सतर्कतेमुळे कोणताही अनुचित प्रकार घडण्याआधी पोलिसांनी मुलींना दादर रेल्वे स्थानकावरून ताब्यात घेतले. चौकशी करून त्यांच्या पालकांच्या ताब्यात दिले. ही पहिलीच घटना नाही. समाजमाध्यमांचे आकर्षण वाढत आहे. अजाणत्या वयाच्या मुलांच्या हातात मोबाईल देऊ नये असे तज्ज्ञ म्हणतात. तथापि ऑनलाईन शिक्षणाने ती मुभा पालकांकडे राहिलेली नाही. अभ्यास या कारणासाठी किंवा त्याच्या नावाखाली मोबाईल मुलांकडे दिला जातो. मुले त्यावर अभ्यास करतही असतील. पण समाजमाध्यमांवर मुशाफिरीही करतात हे नक्की. अडनिड्या वयात मुलांच्या हातात अवघे जग सामावते. नकोशा जगाचा किंवा डार्क वेबचा परिचय होण्याचा धोका वाढतो. समाजमाध्यमांवरील मजकुराचा दर्जा हा गंभीर विषय आहे. मुले या आभासी जगात रमली नाही तरच नवल. त्यांच्याच वयाची काही मुले समाजमाध्यमांवर प्रभावी व्यक्ती असतात. समाज त्यांना डोक्यावर घेतो. माध्यमेही त्यांचे कौतूक करण्यात तसूभरही मागे नसतात. त्या मुलांची समज, त्यांचे शिक्षण, त्यांचा अभ्यास यावर भर न देता त्यांना मिळणारी प्रसिद्धी, क्वचित त्यांची आर्थिक कमाई, त्यांचे चालणे, बोलणे, त्यांचा पोशाख, मॅचिंग याचीच दखल घेतात. ही पिढी स्मार्ट आहे. त्यामुळे बोलघेवडेपणा हा अनेकांचा अंगभूत गुण बनतो. अशा मुलांना कॉपी करण्याची, त्यांच्यासारखे होण्याची महत्वाकांक्षा त्यांचाच वयाच्या मुलांमध्ये जागी होते आणि मग मुले अकारण नको ते धाडस करतात. पौगंडावस्थेतील मुलांची समज त्यांच्या वयाला साजेल अशीच असते. तथापि किती पालक याबाबतीत सजग असतात? मुलांच्या आभासी जगात डोकावून पाहातात? किती पालक मुलांची समाजमाध्यमांविषयी समज वाढवतात? किती पालक स्वतः समाजमाध्यमांचा विवेकी वापर करतात? पालकच त्यात रमत असतील तर मुले रमणारच. या सगळ्याचा नकारात्मक प्रभाव सामाजिक मूल्यांवर पडतो. आधीच त्यांची घसरण सुरु आहे. ती अधिक वेगाने होणाचा धोका वाढतो. समाजमाध्यमांच्या वापराची साक्षरता वाढवणे गरजेचे आहे. तो शालेय अभ्यासक्रमाचा विषय बनवला जावा. पालकांनी ती जाणीवपूर्वक शिकायला हवी. मुलांच्या आभासी दुनियेत काय चालले आहे हे माहित करून घ्यायचे असेल तर पालकांना मुलांसारखा विचार करता यायला हवा. त्यांच्याशी मोकळा संवाद असायला हवा. अनेकदा मुले उत्साहाने काहीतरी सांगू पाहातात. ते तेवढ्याच उत्सुकतेने आणि सजगपणे ऐकायला हवे. त्यातून मुलांच्या मनाचा थांग कदाचित पालकांना लागू शकेल. हे अवघड वाटू शकेल पण अशक्य नाही. मुलांचे भवितव्य उत्तम घडावे, त्यांनी चांगला माणूस बनावे आणि त्यांच्या भावविश्वात कोणतीही पडझड घडू नये अशीच पालकांची इच्छा असते. त्यासाठी पालकांनाच जास्त मेहनत घ्यावी लागेल. त्याला पर्याय नाही.

# पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची गरुडभरारी

**आजच्या भू-राजकीय चित्रात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याइतका यशस्वी नेता दुसरा नाही. आजपर्यंत जे कुणालाही साध्य झाले नाही, ते भारताने मोदी यांच्या नेतृत्वाखाली करून दाखवले. काँग्रेसच्या कोणत्याही नेत्याला म्हणजे सर्वोच्च नेत्यालाही जे करणे जमले नाही ते मोदी यांनी करून दाखवले. मोदी यांना विश्वगुरू म्हटले जाते. पण त्यांनी हे ब्रिद आपल्या कर्तृत्वाने मिळवले आहे. कुणाही चमच्या किंवा चापलूस माणसाने त्यांना हा किताब दिलेला नाही.**




गुजरातमधून आलेल्या एका साध्या इसमाने आज थेट विश्वगुरू व्हावे आणि अमेरिका आणि रशिया यांना एकत्र आणावे, हे कर्तृत्व फक्त आणि फक्त मोदी यांचेच आहे. मोदी यांचे सर्वात मोठे यश हे आहे की त्यांनी संयुक्त घोषणापत्र मंजूर करून घेतले. त्यात रशिया आणि युक्रेन यांच्यातील युद्धाचा उल्लेखही न करता मात्र आजचे युग हे युद्धाचे नाही, असेही हे घोषणा पत्र ठासून सांगते. हा सरळ रशियन अध्यक्ष पुतिन यांना जगाने मारलेला टोला आहे. अमेरिकन अध्यक्ष जो बायडन, फ्रान्सचे अध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांच्यासह अनेक जागतिक नेत्यांचा असा आग्रह होता की, रशियाने युक्रेनविरोधात जे युद्ध चालवले आहे, त्याची यथेच्छ निंदा ठरावात केली जावी. पण रशियाचा उल्लेखही न करता घोषणापत्र मंजूर करून घेण्यात मोदी यांनी आपल्या असामान्य मुत्सद्दीपणाची पराकाष्ठा केली आणि निवेदन मंजूर करून घेतले. मोदी यांच्या राजकीय कौशल्याचा हा विजय आहे. त्यामुळे भारताच्या पंतप्रधानांना आणि त्यांच्या मुत्सद्देगिरीला जग मानते, हेही सिद्ध होऊन जगासमोर आले. रशिया आणि अमेरिका आज भारताशी मैत्री करण्यास उत्सुक आहेत, हे साऱ्या जगाने पाहिले आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सिद्ध केले की, आजच्या भू-राजकीय जगात त्यांच्याइतका यशस्वी नेता नाही. दोन उदाहरणांवरून हे स्पष्ट होते. एक म्हणजे 'जी-२०' परिषदेत तयार केलेले घोषणापत्र परिषदेने मंजूर केले. त्यावेळी जगातील मतभेद आडवे आले नाहीत, तर दुसरे म्हणजे आफ्रिकी युनियनला 'जी-२०' परिषदेचे सदस्यत्व मोदी यांच्या नेतृत्वाखाली बहाल करण्यात आले. त्यामुळे 'जी-२०' आता 'जी-२१' परिषद बनली आहे. रशिया आणि युक्रेन युद्धामुळे कोणत्याही वैश्विक संघटनेत आतापर्यंत संयुक्त घोषणापत्र मंजूर होऊ शकलेले नाही. पण मोदी यांच्या कार्यकाळाचे हे वैशिष्ट्य आहे की, मोदी यांच्याच मुळे हे घोषणापत्र मंजूर करण्यात आले. हा भारताचा फार मोठा विजय आहे. याचे कंगोरे आज समजणार नाहीत. पण आणखी काही वर्षांनी ते लक्षात येतील. शांघाय परिषद असो की ब्रिक्स, यापैकी कोणत्याही परिषदेत असे घोषणापत्र मंजूर करण्यात आलेले नाही. पण 'जी-२०'मध्ये ते मंजूर झाले. याचा अर्थ इतकाच की अनेक देशांचा रशियापेक्षा भारताचे पंतप्रधान मोदी यांच्यावर जास्त विश्वास आहे. वास्तविक युक्रेन संघर्षाच्या संबंधित परिच्छेदावर सर्वसहमती होऊ शकली नाही. म्हणून भारताने तो परिच्छेद गाळून उर्वरित ठराव मतास टाकला आणि मंजूर करून घेतला.

रशिया हा भारताचा जुना मित्र. त्यामुळे रशियाविरोधात काहीही घोषणापत्रात असू नये, याची दक्षता मोदी यांनी घेतली. पण अनेक देशांची युक्रेनवरील आक्रमणासाठी रशिया आणि मुख्यतः पुतिन यांच्यावर जोरदार टीका करावी, असा आग्रह होता. पण मोदी यांनी त्यास नाकारले. अमेरिका आणि फ्रान्स यांच्यासह अनेक देशांच्या प्रमुखांची अशी इच्छा होती की, रशियाची जोरदार शब्दांत निंदा केली जावी. पण मोदी असे काही होऊ देणार नाहीत, याची त्यांना आशंकाही होती. पण अखेर भारताने म्हणजे मोदी यांनी आपली राजकीय कुटनीती पणाला लावून हे घोषणापत्र मंजूर करून घेतले. म्हणून हा मोठा विजय मानला जातो. भारत विश्वगुरू बनण्याच्या दिशेने निघाला आहे, हे अनेक बाबींवरून सिद्ध झाले. आज रशिया आणि अमेरिका यांच्यात भारताशी मैत्री करण्याची स्पर्धा लागली आहे. असे चित्र पूर्वी नव्हते. अमेरिका आणि रशिया, खासकरून अमेरिका ही पाकिस्तानला खूश करण्यासाठी कोणत्याही थराला म्हणून जात असे. आज तसे राहिलेले नाही. मोदी यांनी हा बदल घडवून आणला आहे. भारत - पाकिस्तान युद्धात भारताच्या पराभवासाठी जंग जंग पछाडणारी अमेरिका आज भारताशी मैत्री करण्यास उत्सुक आहे. आज भारताने अमेरिका आणि रशियाला आपल्या स्तरावर आणून ठेवले आहे.

राजकीय आणि मुत्सद्दीपणात भारत आज कुणासमोरही हार पत्करत नाही, हेच मोदी यांनी दाखवून दिले आहे. मोदी यांच्या या परिषदेत सारा जगभरचा मीडिया दाखल झाला होता. त्यावरून भारतातील इव्हेंटला कव्हर करण्यास मीडिया किती उत्सुक आहे, हेही जगाने पाहिले. इतर देशातील अशाप्रसंगी बाहेरच्या पत्रकारांना साधी कॉफी देण्याचीही व्यवस्था नसते. पण कालच्या परिषदेच्या स्थळी बाहेरच्या मीडियातील प्रतिनिधींसाठी पौष्टिक तृणधान्यांचीच चमचमीत मेजवानी होती आणि त्यासाठी फारसा खर्चही आला नव्हता. मोदी यांच्या कार्यकाळात अशा परिषदा भारतीयत्व जपूनही 'अतिथी देवो भव' हे आपले ब्रीद विसरत नाहीत, हेही आता जगासमोर आले आहे. इतक्या धकाधकीतही मोरोक्को येथे झालेल्या भूकंपबळींना आदरांजली वाहण्याचा ठराव मोदी यांनीच मांडला. यावरून त्यांना विश्वगुरू म्हटले जाते, ते किती यथायोग्य आहे, तेही पटते. भारताचे सामर्थ्य जगासमोर मांडण्यात भारत यशस्वी झाला आहे आणि चांगल्या स्मृती घेऊन प्रतिनिधी देश आपापल्या घरी जातील. पण दोन गोष्टी या परिषदेने साबित केल्या आहेत. एक म्हणजे मोदी हेच आज ग्लोबल साऊथचा आवाज बनले आहेत. दुसरे म्हणजे मोदी यांचे घोषणापत्र मंजूर करून घेणे हा फार मोठा विजय आहे. त्यातच 'जी-२०' परिषदेचा विस्तार ही एक नवीन बाब साध्य झाली आहे.

# शिक्षकांना शाळाबाह्य कामातून हवीय मुक्ती

शिक्षकांना मनमोकळेपणाने अध्यापन करण्यासाठी शाळाबाह्य कामातून शासनाने मुक्त करावे म्हणजे बिनधास्तपणे शिक्षक अध्यापन करतील. त्यामुळे त्यांच्या मनावरील ताण कमी होईल. तेव्हा अशी कामे शासनाने स्थानिक सुशिक्षित बेरोजगारांना घ्यावीत. आज अनेक ठिकाणी मुलांचा पट कमी झाल्याने शिक्षकांची संख्या सुद्धा कमी करण्यात आली. मी माझ्या आयनल गावच्या प्राथमिक शाळेत असताना दोन शिक्षक होते. वर्ग मात्र पहिले ते सातवीपर्यंत. त्यात कदम गुरुजी अध्यापनात कुशल असल्यामुळे शासनस्तरावर दिलेली कामे वेळच्या वेळी पूर्ण करायचे. मात्र अध्यापनामध्ये कधी दुर्लक्ष केले नाही. त्यात सात वर्ग प्रत्येकी पाच ते सात विषय, पाचवीपासून तीन भाषा यामुळे साहजिकच शिक्षकी पेशा त्रासदायक म्हणावा लागेल. कारण अध्यापन करत असताना पहिल्या प्रथम पुस्तकांचा स्वतः अभ्यास करून त्या धड्याचा आशय समजून घ्यावा लागतो. जर आशय समजला तरच अध्यापक खुल्या मनाने अध्यापन करू शकतात. ते सुद्धा त्यांचा घरप्रपंच सांभाळून. तेव्हा त्यांना सुद्धा वेळ देणे आवश्यक असते. शिक्षकांना शाळाबाह्य कामे दिल्याने त्यांचा अध्यापनाकडे दुर्लक्ष होतो. याचा परिणाम चांगले विद्यार्थी घडू शकत नाही. त्यासाठी अध्यापकांना अध्यापनाचे काम द्यावे. मात्र या दृष्ट चक्रातून अध्यापकांना बाहेर काढावे लागेल तरच चांगले विद्यार्थी निर्माण होऊ शकतात.

आत शिक्षकांना कोणकोणती शाळाबाह्य कामे करावी लागतात याचा थोडक्यात आढावा घेऊ. प्राथमिक विभागातील शिक्षकांचा विचार करता त्यांना शाळा उघडण्यापासून बंद करणे, शाळेचा दप्तर तसेच शाळेची साफसफाई करण्यापर्यंत सर्व कामे करावी लागतात. ही कामे माध्यमिक विभागातील शिक्षकांना करावी लागत नाही. त्यासाठी स्वतंत्र स्टाफची नियुक्ती केली जाते. त्यामुळे ते अध्यापनावर लक्ष केंद्रित करतात. आपल्या राज्यात आज पाहिल्यावर अध्यापकांचे ऑफ लाईन काम सुरू आहे. त्यात काही वेळा ऑनलाइन मिटिंग सुद्धा असतात. ऑनलाइन कामाचा विचार करता शाळेत आपल्यावर मोबाइलमध्ये मुलांचे फोटो काढायचे आणि शिक्षण विभागाला पाठवायचे. म्हणजे शाळेतील मुलांची हजेरी झाली त्यात रेंजचा लपंडाव असतो त्यामुळे सध्याचे शिक्षक वर्ग जेरीस आलेले दिसतात. कोरोना काळात तर शाळेच्या समोर असणाऱ्या झाडाखाली बसून चाकरमान्यांची देखरेख करण्याचे काम केले. आता अधिक विस्ताराने त्यांच्या कामाचा विचार करू. यामध्ये ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषदा, विधानसभा व लोकसभा इत्यादी निवडणुकांमध्ये शाळा बंद ठेवून काम करावे लागते. त्यात आधी प्रभागातील मतदार याद्या तयार कराव्या लागतात. तसेच गावातील साक्षर व निरक्षर यांचे सर्वेक्षण करावे लागते. गावची जनगणना व गावातील दारिद्र्य रेषेखाली जे लोक जीवन जगत आहेत त्यांचा सर्व्हे करावा लागतो.

अध्यापक ज्या शाळेमध्ये अध्यापन करतात त्याच शाळेत अध्यापना बरोबर शाळेत शालेय व्यवस्थापन समिती, पालक समिती, मातापालक समिती, शालेय पोषण आहार समिती, विद्यार्थीनी सुरक्षा समिती व व्यसनमुक्ती समिती अशा विविध समित्या तयार करून समित्यांची बैठक घेणे तसेच त्या बैठकीचे इतिवृत्त शिक्षकांना लिहावे लागते. त्याचप्रमाणे शाळेतील मोफत पाठ्यपुस्तक योजना शाळेच्या पटसंख्येनुसार वर्गवार पुस्तकाची मागणी करावी लागते. त्यासाठी तालुक्याच्या ठिकाणी जाऊन क्रमिक पुस्तके आणावी लागतात. त्याप्रमाणे पुस्तकांचे प्रत्येक विद्यार्थ्यांना वाटप करावे लागते तसे शाळेच्या रजिस्टरमध्ये विद्यार्थ्यांच्या नावांची नोंद करून त्यावर त्यांची सही घ्यावी लागते. एक प्रकारे अध्यापन बाजूला सारून कारकुनाची कामे करावी लागतात, असे म्हणावे लागेल. विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहार स्टॉक व लाभार्थी ऑनलाइन करावे लागतात त्यासाठी शाळा व एकूण विद्यार्थ्यांची माहिती द्यावी लागते. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांचे परीक्षेत मिळालेले गुण, शाळेची माहिती गुणपत्रिकेत लिहावी लागते. तसेच खाडाखोड न करतात मुलांचे शाळेचे दाखले लिहून द्यावे लागतात. इतकेच नव्हे तर अध्यापकांना आपल्या शाळेत शालेय योजनांची प्रामाणिकपणे अंमलबजावणी करावी लागते. तसेच वातावरण पाहून शाळेतील मुलांची आरोग्य तपासणी करीत असतात. काही ठिकाणी आरोग्य शिबीर लावले जाते. मुलांच्या आरोग्याबरोबर त्यांचे विविध शिष्यवृत्तीसाठी विद्यार्थ्यांचे ऑनलाइन फॉर्म भरून विद्यार्थ्यांची शिष्यवृत्तीच्या अभ्यासक्रमाची तयारी करून घेत असतात. त्याचप्रमाणे मुलांचे शिष्यवृत्ती परीक्षेचे हॉल तिकीट काढावे लागते. तसेच ज्या केंद्रावर परीक्षा असेल त्याठिकाणी मुलांना घेऊन जाणे व परत त्यांच्या घरी सोडण्याचे काम करतात. शाळेत दिव्यांग विद्यार्थी असेल तर त्याची विशेष काळजी घेत असतात. अलीकडे तर आपल्या परिसरातील शाळाबाह्य मुलांचा शोध घेऊन शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याचे काम त्यांना देण्यात आले आहे. म्हणजे असे भावी पिढी सुशिक्षित करणाऱ्या शिक्षकांना अनेक शाळाबाह्य कामे करावी लागतात. तेव्हा शिक्षकांना शिकवू द्या व विद्यार्थ्यांना शिकू द्या या मागणीसाठी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीला शिक्षक दिनी रजा आंदोलन करण्याची वेळ आली. तेव्हा पुन्हा आपल्या न्याय मागणीसाठी आंदोलन करण्याची सामूहिक वेळ राज्यातील प्राथमिक शिक्षकांवर येऊ नये यासाठी शिक्षकांच्या घोषवाक्याचा विचार करून त्याची त्वरित अंमलबजावणी करावी म्हणजे शिक्षक शाळाबाह्य कामातून मुक्त होऊन हसत-खेळत अध्यापन करतील.


## शब्दकोडे-१७७

**आडवे शब्द**

१. 'अवजड' झालेले माजी मुख्यमंत्री ८. हल्लीच्या युगात याच्याशिवाय नमस्कार नाही! ११. मजबूत १२. नेत्र, डोळा १३. रक्षा १४. प्रजा १६. काहींसाठी हे निद्रासन १७. वन्य जीव १९. घागरा २१. कलावंत २२. मोठी टोपली २३. अर्जुनाचा रथ चालवणारा श्रीकृष्ण २४. युद्ध २७. श्री विष्णूचा बटु अवतार ३०. भांडणातील कळीचा मुद्दा ३२. उत्तराधिकारी ३५. बाजार ३६. तोफगाडी ३८. रविवार ४०. अनुमती ४३. सडेतोड, स्पष्ट ४५. कडक व चिवट ४६. वजनदार, हिंदीत पायाभूत उद्योगाला 'भारी' शब्द ४८. स्वयंप्रकाशी किडा ४९. देव ५०. पोते ५२. महान ५३. हद्दपार ५४. गणपतीचे एक नाव ५५. गुजराथी नृत्यप्रकार ५८. विपुलता, रेलचेल ६०. सुसर ६३. श्री विष्णूचा अष्टाक्षरी मंत्र ६७. धाक, भीती ६९. पातक ७०. गाढव ७१. उदार, देणारा ७२. कुळाशी करारमदार ७४. उत्सवाचे दिवस ७५. स्वीकारच्या विरूद्ध ७६. लोण्यासाठी भांडणारा

**उभे शब्द**

१. विस्मरण २. सदोदित ३. संताप, क्रोध ४. भाजणीपासून बटाट्यापर्यंत कुठलाही असला तरी चवदार ५. मंदवासर ६. खोदकाम ७. करंजी ८. सजीव-निर्जीव सर्व ९. महिरप १०. रड्या माणूस १५. योग्य, बरोबर १६. हिंदीत संशय १८. असंमती १९. उद्याच्या नंतरचा दिवस २०. मोठमोठे पराक्रमी योद्धे २१. हात २३. मर्यादा २४. एक तंतुवाद्य २५. मृत्यू २६. शिष्य २८. अपशकुन २९. बारीक दगड ३०. व्यायाम ३१. सखोल ३३. सूर्याचे एक नाव ३४. प्रश्नोत्तरे ३७. स्वराचे वरदान लाभलेला ३९. कमळ ४०. दिवंगत ज्येष्ठ खलनायिका, ललिता --- ४१. पूर्वज ४२. कवी ४४. मावा ४६. अपमान ४७. भीती ४८. लोखंड घासण्याचे हत्यार ४९. काजळाचा एक प्रकार ५१. बायको ५३. लोकनाट्य ५६. श्री विष्णूचे एक नाव ५७. बगिचा ५९. मजबूत ६१. रात्र ६२. उलट, विरूद्ध ६४. लंकेचा राजा ६५. बाई ६६.




१. सुरुवात, परिचय ३. एकरूपता ६. तुसडा ९. रासायनिक असल्यास जमिनीचा कस कमी करणारे थोडक्यात साष्टांग नमस्कार विनंती विशेष १७. श्रीराम आणि पांडवांच्या वाट्याला आलेला समान भोग १९.

### शब्दकोडे १७६ चे उत्तर

**आडवे उत्तर**
१.१.रुजवात ३.समरसता
६.माणूसघाणा ९.रत १०.पारो
११.पतन १३.वाट १४.सानविवि
१७.वनवास १९.यावनाल
२२.शानदार २३.ललकारी
२४.गज २५.कालव २६.सदा
२७.बरबाद २९.वाल
३०.सटरफटर ३३.बरका
३५.साहस ३७.पारवा ३८.कसरत
४०.वाव ४१.रमणी ४२.साईबाबा
४५.राजा ४६.फणस ४७.धाव
४८.गवगवा ५०.दाम ५२.मणेर
५४.दादला ५५.नयनबाण
५८.जनकजननी ६१.पंक ६२.शीर
६३.रवा ६५.पर ६६.हालचाल
६९.तप ७१.विप्र ७२.नवरस
७४.समतल ७६.रमावर ७८.धाम
८०.रसदार ८१.तनमनधन
८२.पोट ८३.रवानगी

**उभे उत्तर**
१.रुखसाना २.जतन ३.सरोवर
४.रखवालदार ५.ताप ६.मानव
७.सवालजबाब ८.घाट
१२.तयारी १५.विशाल
१६.विनवणी १८.सल
२०.नागर २१.ब्याद
२५.कालहरण २६.सटवाई
२८.दरवाजा २९.वासा
३०.सरसावणे ३१.टक
३२.रस ३४.काव ३६.समसमान ३९.रम्य ४३.बाग
४४.बावनकशी ४५.रामदास
४६.फर्मान ४७.धामण
४९.वाचन ५१.कलाकार
५३.रजक ५६.यमल
५७.बादल ५९.जरतर ६०.नीर
६५.पंतप्रधान ६४.वारसदार
६५.पाळत ६६.हावरट
६७.चाकवत ६८.धन
७०.पसरट ७३.वसा ७५.मरवा
७७.रन ७९.मध



## सोभाव (सुत्र ७) मानवनं खरं जीवन

पूर्वार्जित जस -हास तस वडिलार्जित मानूसना सोभाव बनस असा गनजसनी समज व्हस हाई गोट पूरातन धर्मशास्त्रकारकसले बी मान्य शे.असा भ्रम कित्येकसमा व्हयेल शे.अस दिखायी पडस.त्यामुये सोकष्टार्जित सोभाव हाई कल्पना त्यासले करवत नै. जो कष्टार्जित सोभाव शे तो सोभाव कसा असाच त्यासना युक्तिवाद -हास.सोभावले पूर्वार्जितना आनी वडिलार्जितना असा काही संबंध नै अस म्हनीसन त्यासनी धार्मिक भावना दुखावस असा त्यासना राग संताप व्हत जास.पन सोभाव हाऊ जर सोकष्टार्जित असा बनवता येतात नै ते,आत्मैव ह्यात्मनो बंधूरात्मैव रिपुरात्मनः मन एवं मानूसना कारनं बंधमोक्षयो, योगच्श्रितृवृत्तिनिरोधःतो यच्छ्द्ध स एवंसः अशी ऋषिवचन आपुनले वाचाले,दखाले लेता येत नै.मनाची क्षते पाहता दोष जाती,नै ते क्रिया पालटे तात्काल,तसाच'मूळ सोभाव जाईना ' आसी एकमेकना विरूद्ध वचने आपले दिखाई देतात नैत.ह्यानामा समर्थ संत तुकाराम महाराज सारखासले मूळ सोभाव जाईना असं म्हनत तो बदलत नै.असा सिध्दांत मांडना व्हता नै ते परिस्थितीपरमाने सोभाव बदलाले जोयजे पन मानूस तसा परिस्थिती सापेक्ष सोभाव तयार करत नै. हाऊ त्याना मोठा दोष शे.अस त्याले सांगन शे कां? सोभाव बदलत नै असं जर सांगन व्हयीन ते वर सांगेल जसं शे तसचं त्याना वचनना अर्थ लावाना कां? वस्तूतः सोभाव आनी मन या दोन न्या-या अशा वस्तू शेतीस.परंतु आजबी आपून सोभावन्या आनी मन आनी मनन्या जागी सोभाव असं वाचीसन मोक्या व्हतस.तव्हय मनले शिकाड काय आनी सोभाव बनाडा काय एकच अर्थथून वापरतस.तात्पर्य, सोभाव हाऊ सोकष्टार्जित अधिक असू शकत आनी तो तसा येस व्हयीन असाले जोयजे हाऊ धर्मशास्त्रकारस्ना आनी योगशास्त्रकारस्ना,वा गीतादी यासना आग्रह दिखायी पडस.त्याना पूर्वजिंतावर वा वडिलार्जित आपूनना सोभावनी भिस्त घालीन सोस्थ बसनं पसंत नै.आनी म्हनीसन धर्म आनी मोक्ष हाऊ त्यासनी पुरुषार्थ म्हनेल शे.आपून धर्म ना नावखाले अर्धं मन पालन करतस आनी धर्मना फल नी अपेक्षा करतस, तव्हय ती कशी भेटीन? जीवनमा पायना नखसपआईन डोकापावत असा सोभावमा बदल एकदाव नै ते अनेकदाव व्हवाले जोयजे आनी म्हनीनसन मानूसले धर्म सांगना पडस.ह्या वरन्या समद्या गोष्टी अज्ञानमातल्या शेत असा आग्रह सोडीसन सोभाव प्रयत्नपुर्वक बनाले राव्हाले जोयजे हाऊच खरा अर्थान मानाले जोयजे हाईच मानवंन खरं जीवन जगनं शे.

**- प्रा.भगवान पाटील. अध्यक्ष, अहिरानी साहित्य परिषद धुळे**

हे मराठी दैनिक मालक **विजय आत्माराम ठाकरे** यांनी मुद्रक-प्रकाशक-संपादक- चंद्रशेखर आत्माराम पाटील यांच्या पार्वती प्रिंटर्स-२, ई ११५/३, एम.आय.डी.सी., अवधान, धुळे (एम-५) येथे छापून, लक्ष महाराष्ट्र कार्यालय, बॉम्बे लॉज बिल्डींग, पहिला मजला, आग्रारोड धुळे येथून प्रकाशित केले.
**'लक्ष महाराष्ट्र' नाशिक कार्यालय** - फ्लॅट नं.१०, गंगा अपार्टमेंट, बोहरा पार्क, गंगापूर रोड, नाशिक-४२२००२ **मध्यवर्ती कार्यालय-** बॉम्बे लॉज बिल्डींग, दौलत म्युझिक सेंटरच्यावरती, पहिला मजला, आग्रारोड, धुळे. मो.९६६४३२५५५५ फोन नं. ०२५६२-३५६५७४.
**नंदुरबार कार्यालय** - शॉप नं. ११/१२, संत दगा महाराज कॉम्प्लेक्स, कोरीट नाका, नंदुरबार. **जळगाव कार्यालय** - बी विंग, रुम नं. ११ तिसरा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव. E-mail: lakshamaha.dhule@gmail.com. (RNI No.MAHMAR/2019/79184)

# नाशिकच्या गणेश मंडळांना महापालिकेकडून मंडप शुल्कात दिलासा

**नाशिक । प्रतिनिधी**

अवघ्या काही दिवसांवर गणेशोत्सव येऊन ठेपला असून गणेश मंडळाची जोरदार तयारी सुरु आहे. अशातच नाशिकमधील हजारो मंडळांना मनपाने दिलासा दिला आहे. गणेशोत्सव मंडळांच्या मंडपांना शुल्क माफी देण्याचा प्रस्ताव अखेर नाशिक महापालिकेच्या महासभेत मंजूर झाला असून तसे आदेश आयुक्त तथा प्रशासक डॉ. अशोक करंजकर जारी केले आहेत. मात्र वाणिज्य स्वरूपाच्या जाहिराती घेतील, त्यांना जाहिरात शुल्क भरणे अनिवार्य करण्यात आले आहे.

काही दिवसांवर आलेल्या गणेशोत्सवासाठी नाशिककर सज्ज झाले असून गणेश मंडळांकडून देखाव्यांची तयारी अंतिम टप्प्यात आली आहे. दरम्यान गणेश मंडळांना महापालिकेकडून मंडप शुल्कात दिलासा मिळाला आहे. गणेश मंडळांना पालिकेकडून आकारला जाणारा मंडप शुल्क आणि जाहिरात कमान शुल्क माफ केला आहे. यामुळे शहरातील असा बाराशेहुन अधिक मंडळांना दिलासा मिळाला आहे. सार्वजनिक गणेशोत्सवात महानगरपालिकेच्या जागेवर मंडप, व्यासपीठ आणि कमानीसाठी ७५० रुपयांचे शुल्क माफ करण्यास मान्यता देण्यात आली आहे. मात्र गणेशोत्सवात वाणिज्य जाहिराती प्रसिद्ध केल्यास मंडळांना जाहिरातीच्या आकारमानानुसार परवाना शुल्क आणि जाहिरात कर भरावा लागणार आहे. नाशिक महापालिकेची महासभा आणि स्थायी समितीची सभा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अशोक करंजकर यांच्या उपस्थितीत पार पडली. यावेळी हा निर्णय घेण्यात आला आहे. दरम्यान सार्वजनिक गणेशोत्सवानिमित्त आयोजित बैठकीत आरास मंडप व्यासपीठाच्या परवानगीसाठी लागणारी शुल्क माफ करण्यात यावे अशी मागणी गणेश मंडळांनी केली होती. त्या अनुषंगाने हा विषय महासभेच्या पटलावर ठेवण्यात आला होता. मंडळांना मंडप व्यासपीठ व कमानीच्या परवानग्यासाठी आता ७५० रुपये शुल्क द्यावे लागणार नाही, परंतु संबंधित मंडळांनी वाणिज्य जाहिराती प्रसिद्ध केल्यास जाहिरातीच्या आकारमानानुसार परवाना शुल्क व जाहिरात कर द्यावा लागणार असल्याचे मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉक्टर अशोक करंजकर यांनी म्हटले आहे.

**बाराशे गणेश मंडळांना दिलासा**

**गणेश मंडळे देखावे उभारण्यासाठी जे मंडप बांधतात, त्यासाठी नाशिक महापालिका दरवर्षी मंडप शुल्क आकारते. ते जास्तीत जास्त साडे सातशे इतके होते. मात्र, ते माफ करण्यात आल्याने मंडळांना काही प्रमाणात दिलासा मिळाला आहे. दरवर्षी गणेशोत्सवात मंडप शुल्क माफ करण्याची मागणी होत असते. अनेकदा मुंबई, पुणे सारख्या शहरात मंडळाची गर्दीही खूपच असते, त्यामुळे त्यांचे शुल्क माफ होत असते, मात्र, नाशिक शहरातही अनेक गणेश मंडळे असूनही दरवर्षी शुल्क माफ करण्याची मागणी करावी लागते. यंदा देखील उत्सवाच्या पार्श्वभूमीवर अशीच मागणी करण्यात आली होती. पोलीस आयुक्तालायात झालेल्या गणेशोत्सव महामंडळाच्य बैठकीत यासंदर्भात चर्चा झाली, तेव्हा आमदार देवयानी फरांदे यांनी देखील शुल्क माफ करण्याची सूचना महापालिकेच्या उपस्थित अधिकाऱ्यांना केली होती. त्यानंतर हा प्रस्ताव महापालिकेच्या महासभेत मांडण्यात आला होता. तो मंजुर करण्यात आला आहे.**

---

## जाहिर नोटीस

तमाम जनतेस व सर्व संबंधिताना तसेच सर्व वित्तीय संस्था स्थानिक स्वराज्य सथा, महावितरण कम्पनी, याना या जाहीर नोटीसीने कळण्यात येते की, मौजे नंगाव ता.जि. धुळे येथिल ग्रामपंचायत मालमता क. ३७९ त्यासी ऐकुण क्षेत्र ३० बाय ३० असे आहे. सदर मिळकत ही आज रोजी उत्तरेकडील भाग १५बाय ३० पत्रा बांधीव घर आहे तर उर्वरीत दक्षिणेकडील १५ बाय ३० चे क्षेत्र हे आज रोजी बखळ जागा ही या जाहीर नोटीस च्या भाग आहे. या मिळकतीच्या चतुसिमा खालील प्रमाणे-

पूर्व-रस्ता
पश्चिम- रस्ता
दक्षिण- रस्ता
उत्तर याच मिळकतीचा उर्वरीत भाग पत्रा बांधीव पर जागा ही लिहुन देणार याच्या मालकीची

वरील वर्णणांकीत मिळकतीपैकी दक्षिणेकडील १५ बाय ३० चे क्षेत्र आमचे पक्षकार यानी सदर मिळकतीचे मालक व कब्जेदार भिका रमजान भिल याच्या सोबत वर नमुद आलेली मिळकत कायम खरेदीने विकत घेण्याच्या व्यवहार आमचे पक्षकार यानी केलेला आहे. त्या साठी जाहीर नोटीस प्रकाशित करीत आहे.

तसेच सदर मिळकत ही कोणत्याही संस्थेकडे, बँकेकडे किवा इतर कोणाहीकडे तारण गहाण / नजर गहाण असल्यास किंवा त्यावर कोणाचाही कोणत्याही प्रकारचाही उजर आक्षेप असल्यास पुराव्याचे मुळ कागद पत्रासह खालील पत्यावर ही नोटीस प्रकाशित झाल्याचे तारखेपासुन ७ दिवसाचे आत प्रत्यक्ष येवून भेट घ्यावी तोंडी हरकत किंवा परस्पर वर्तमान पत्रात जाहीर हरकत नोटीस दिल्यास सदरची हरकत / नोटीस आमचे पक्षकार अशिलावर बंधनकारक राहणार नाही. मुदतीनंतर कुणाचीही हरकत आल्यास ती आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही.

सदरची नोटीस पक्षकाराने दिलेल्या कागदपत्र, माहीतीवरून व सागणेवरून आमचेमार्फत प्रसिध्दीस दिली असे.

धुळे
दिनाक

**ॲड. एस. व्ही. जोशी**
वकील निवास, हमाल मापाडी प्लॉट
समता भवन जवळ, मार्केट यार्ड, धुळे.

---

## जाहिर नोटीस

तमाम जनतेस बँकाना हितसंबधितांना सदर जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे : मौजे वलवाडी, ता.जि.:-धुळे येथील बखळ प्लॉटस

**०१)** स.नं.६७/१अ+१ ब पैकी प्लॉट नं.१९ चे एकुण क्षेत्र.१३०चौ.मी. यास सि.स.नं.२२४५ चे एकुण क्षेत्र. १२७.९० चौ.मी. सत्ताप्रकार क पुर्वेस:-१२ मी.रस्ता, पश्चिमेस:-प्लॉ.नं.१४, १५, १६, दक्षिणेस:- प्लॉ नं.२०,उत्तरेस:-प्लॉ.नं.१८

**०२)** स.नं.६७/१अ+१ ब पैकी प्लॉट नं.२१ चे एकुण क्षेत्र. १७३.२५चौ.मी. यास सि.स.नं.२३०८ चे एकुण क्षेत्र. १५५.१० चौ.मी. सत्ताप्रकार क पुर्वेस:-प्लॉ.नं.२८,२९,पश्चिमेस:- १२ मी. रस्ता,दक्षिणेस:- ॲ.स.नं.६७/२,उत्तरेस:-प्लॉ.नं.२२

**०३)** स.नं.६७/१अ+१ ब पैकी प्लॉट नं.२२ चे एकुण क्षेत्र. १६०चौ.मी. यास सि.स.नं.२३०९ चे एकुण क्षेत्र. १५५.१० चौ.मी. सत्ताप्रकार क पुर्वेस:-प्लॉ.नं.२६,२७,पश्चिमेस:- १२ मी. रस्ता,दक्षिणेस:-प्लॉ.नं.२१,उत्तरेस:-प्लॉ.नं.२३

**०४)** स.नं.६७/१अ+१ ब पैकी प्लॉट नं.२३ चे एकुण क्षेत्र. १५५चौ.मी. यास सि.स.नं.२३१४ चे एकुण क्षेत्र. १५५.०० चौ.मी. सत्ताप्रकार क पुर्वेस:-प्लॉ.नं.२४.२५,पश्चिमेस:- १२ मी.रस्ता,दक्षिणेस:-प्लॉ.नं.२२,उत्तरेस:-६ मी.रस्ता

येणे प्रमाणे चतु : सिमेतील मिळकत हया चेअरमन योगेश्वर सहकारी गृह निर्माण सोसायटी लि.धुळे, ता. जि. धुळे यांचे नावे ७/१२ दप्तरी फेरफार नोंद क्रमांक ३३०३ व ३३०४ तसेच सिटी सर्व्हे दप्तरी फेरफार नोंद क्रंमाक २०७० दिनांक १२/१२/२०१८ अन्वये त्यांचे नावे प्रमाणित होती व आहे. अशी त्यांची कब्जे उपभोगातील वहीवाटीतील मिळकत त्यांनी आमचे आशिल यांचे पासुन बयाणा रक्कमेचा स्विकार केलेला असुन त्यांनी आमचे आशिल यांचे लाभात रजिष्टर सौदापावती देखील लिहुन दिलेली आहे. सदर शेताची सरकारी मोजणी झाले नंतर लगेचच खरेदीखत नोदंणीचे काम करणेत येणार आहे. त्यांचे सांगणेवरुन आमचे मार्फत जाहीर नोटीस प्रसिध्द करण्यात येत आहे. सदर मिळकतीवर इतर कोणाचाही कुठल्याही प्रकारे हित संबध देणे घेणे, मालकी हक्क, भाडेपटटा वा लिज, ताबा, गहाण, बोजा, टाच वा वारस, खावटी असल्यास सदर नोटीस जाहीर झाल्यांचे ०१ दिवसांचे आत योग्य त्या कागदपत्राच्या प्रति सहीत आमचे ऑफिसांत हरकती सादर कराव्यात. परस्पर जाहिर नोटीस वर्तमानपत्रांत आल्यांस त्या ग्राहय धरण्यांत येणार नाही व हरकती न आल्यास आमचे पक्षकार हे सदर मिळकतीचे बोनाफाईड पर्चेसर आहेत असे समजले जाईल व सदर मिळकत ही निर्वेध व निर्बोज म्हणुन खरेदीखत करतील नंतर आलेल्या हरकती हया ग्राहय धरल्या जाणार नाही. सदर पेपर नोटीस ही आमचे मार्फत आमचे आशिलांनी दाखविलेल्या कागदपत्रावरुन व त्यांनी तोंडी कथन केलेल्या माहीतीवरुन देण्यात आलेली आहे. येणे प्रमाणे जाहीर नोटीस होय.

धुळे
दिनांक१२/०९/२०२३

**ॲड. योगेश सुभाष शिंदे**
एफ-४४ पहिला मजला, गरुड मैदान
संकुल, कमलाबाई शाळेसमोर, धुळे
मो.९४०३७६२८३४

---

## जाहिर नोटीस

तमाम जनतेस, सर्व हित संबंधीतांना तसेच सर्व वित्तीय संस्था, व स्थानीक स्वराज्य संस्था यांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की खालील परिशिष्ठात नमूद केलेली मिळकतीचे मालक जगदिश संपत शिंदे रा. धुळे ता. जि. धुळे यांच्याशी आमचे अशिल यांनी खालील नमुद मिळकत कायमस्वरूपी विकत घेण्याचा सौदा केलेला असुन लवकरच सदर खरेदीचा व्यवहार पूर्ण करणार आहे. सदर मिळकतीच्या टायटल व्हेरीफिकेशन हेतु सदर जाहिर नोटीस प्रसिध्द करीत आहे.

सदर मिळकतीबाबत कोणाचे काही हक्क हितसंबंध, तारण, गहाणखत, सौदा पावती, बोजा, मुखत्यारपत्र इतर काही हक्क, संबंध, अगर संकल्पीतव्यवहारास कोणत्याही प्रकारे हरकत वा विरोध दिलेल्या पत्यावर कळवावे. परस्पर वर्तमान पत्रात घेतलेल्या हरकतीचा तसेच दस्तऐवजांशिवाय असल्यास आवश्यक तया मुळ कागदपत्रासोबत ७ दिवासांच्या आंत नोटीस प्रसिध्दी पासुन खालील दिलेल्या पत्त्यावर कळवावे. परसस्पर वर्तमान पत्रात घेतलेल्या हरकतीचा तसेच दस्तऐवजांशिवाय घेतलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही.

नियोजीत मुदतीत कोणाचीही साधार व लेखी तक्रार न आल्यास सदर मिळकत निर्वेध व निबज असुन तथाकथीत हक्क व अधिकार संबंधीतांनी सोडुन दिलेले असे समजुण सदर व्यवहार पुर्ण करण्यात येईल. या नंतर कोणीही काहीही तक्रार, हितसंबंध अगर हक्क दाखविल्यास ते आमचे आशिल आणि सदर मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी, कळावे.

परिशिष्ट

मौजे वलवाडी ता. जि.धुळे येथील धुळे महानगर पालिका हद्दीतील बिनशेती रहिवासी प्रयोजनार्थ (N.A) नगर भुमापन क्रमांक व उपविभाग १५४/१५५/१५६/१५७/म.अ. प्लॉट नं./३७/मो.प्र.प्लॉट नं.५० मधील क्षेत्र ७३.७५ चौ.मी असे असुन यासी चतु:सिमा खालीलप्रमाणे.

पूर्वेस - प्लॉट नं. ६७
पश्चिमेस -९ मीटरचा रस्ता
दक्षिणेस-प्लॉट नं. ४९
उत्तरेस -प्लॉट नं. ५१

येणेप्रमाणे जाहिर नोटीस आमचे अशिलाने दिलेल्या माहिती व सांगितलेवरून त्यांचे तर्फे आमचे मार्फत प्रसिध्दीस दिली असे.

येणे प्रमाणे जाहिर नोटीस असे.

धुळे.
दिनांक १२/०९/२०२३

**ॲड. प्रविण भिमराव सिसोदे**
७. दिघे ॲडव्होकेट चेंबर्स,
धुळे जिल्हा कोर्टासमोर,
स्टेशन रोड, धुळे, ता.जि. धुळे

---

**अँड. देवराम डी. बागुल**
**निशाणी नं.- ६**

## जाहिर नोटीस

**धुळे येथिल मा. दिवाणी न्यायाधिश सो. व. स्तर यांचे न्यायालयात**

**दि. कि. अर्ज. क्र.१०८४/२०२३**

१. अविनाश सुजित सैंदाणे
उ. वय: २७ वर्ष, धंदा :- नौकरी
२. मालीनी सुजित सैंदाणे
उ. वय.:- २१ वर्ष, धंदा :- शिक्षण
नं. १ व २ रा. प्लॉट नं. २३ ब, पारीजात कॉलनी, जनार्दन चक्कीजवळ, साक्री रोड, धुळे, ता. जि. धुळे. .....अर्जदार
वि
कोणीही नाही ........सामनेवाला
आणि
१. कै. सुजित शिवराम सैंदाणे (मयत)
मृत्यु दिनांक २०/०८/२०२३,
२. कै. उषाबाई सुजित सैंदाणे (मयत)
मृत्यु दिनांक : ०४/०४/२०२१
दोघांचे मृत्यु ठिकाण धुळे, ता. जि. धुळे .......मयत

ज्याअर्थी अर्जदार यांनी धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधिश सो. क. स्तर यांचे न्यायालयात दि. ५/९/२०२३ रोजी दि. कि. अर्ज. नं. १०८४/२०२३ चा अर्ज दाखल केलेला आहे. ज्याअर्थी कै. सुजित शिवराम सैंदाणे (मयत) यांचे अर्जदार नं. १ व २ हे कायदेशीर वारस असल्याने त्यांना तसा कायदेशीर वारस दाखला मिळणेसाठी धुळे येथील मे. न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी मे. न्यायालयाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरता पुढील चौ. दि.१२/१०/२०२३ ही निश्चित केली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वारस, वगैरे संबंधीतांना कळविण्यात येते की, याबाबत काही वाद असल्यास धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधिश सो. क. स्तर कोर्ट नं.. ६. यांचे न्यायालयात उक्त निश्चित तारखेस सकाळी ठिक १०:०० वाजता उपस्थित राहुन हरकत नोंदवावी त्याअर्थि मे. कोर्टाने दिलेल्या व निश्चित केलेल्या तारखे पर्यंत कोणाचीही काहीही हरकत आली नाही. तर सदर अर्जाचे काम काज पुर्ण करण्यात येईल त्यानंतर येणाऱ्या तक्रारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

ठिकाण :- धुळे
दिनांक :- ११/९/२०२३ आदेशावरुन

शिक्का

**कामगिरी कारकुन** — **मे. दिवाणी न्यायालय सो. कोर्ट न.**
**अधिक्षक,** — **मे. दिवाणी न्यायालय सो. कोर्ट न.**

---

**ॲड.डी.ए. झोडपे**
**निशाणी नं.- ६**

## जाहिर नोटीस

**धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर सो. यांचे कोर्टात**

**दि.कि. अर्ज नं. १०५१/२०२३**

१. शांताबाई माणिकराव भुजबळ
उ. वय ४९ धंदा- घरकाम
२. अनिल माणिकराव भुजबळ
उ. वय ३४ धंदा -मजुरी
३. पंकज माणिकराव भुजबळ
उ. वय ३२ धंदा -मजुरी
सर्व रा. इंदिरा नगर, वाडीभोकर रोड,
वलवाडी ता. जि. धुळे .....अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही
१. माणिकराव लक्ष्मण भुजबळ (मयत)
मृत्यू दिनांक (०४/१२/२०२०) ...... सा. वाला

ज्या अर्थी अर्जदार यांनी धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश सो. कनिष्ठ स्तर धुळे यांच्या न्यायालयात २९-०८-२३ रोजी दि.कि. अर्ज नं. १०५१/२०२३ चा वारस दाखला (Legal Hier Certificate) रा. इंदिरा नगर, वाडीभोकर रोड, वलवाडी ता.जि.धुळे अर्जदार यांनी दि.बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम VIII(II) दि. बॉम्बे प्रमाणे कायदेशिर वारस ठरवून मिळण्याकरिता सदरचा अर्ज मे न्यायालयात दाखल केलेला आहे. त्या अर्थी मे न्यायालयाने पुढील चौकशीचे कामकाज चालविण्याकरीता पुढील चौकशी दिनांक १२/१०/२०२३ ही निश्ति केलेली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वारस, वगैरे संबंधितांना कळविण्यात येते की, याबाबत काही वाद असल्यास धुळे येथील मे. ४ थे दिवाणी न्यायाधीश सो. कनिष्ठ स्तर यांच्या न्यायालयात दिनांक १२/१०/२०२३ रोजी १०.३० वाजेचा सुमारास मे. न्यायालयात दिलेल्या व निश्चित केलेल्या तारखेपर्यंत कोणचीही काहीही हरकत न आल्यास सदरच्या अर्जाचे कामकाज पूर्ण करण्यात येईल त्यानंतर येणाऱ्या तक्रारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

ठिकाण : धुळे
दिनांक : ११/९/२०२३ आदेशावरुन

शिक्का

**कामगिरी कारकुन** — **सह.न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, धुळे**
**अधिक्षक,** — **सह.न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, धुळे**

---

**ॲड. एफ.बी. शेख**
**निशाणी नं.- ६**

## जाहिर नोटीस

**धुळे येथील मे, दिवाणी न्यायाधीश सो. व. स्तर यांचे न्यायालयात**

**दिवाणी किरकोळ अर्ज क. १०६६/२०२३**

१) हुसैन मिला पिंजारी (मयत) १.१) इरशादबी हुसैन पिंजारी
१.२) नौशाद हुसेन पिंजारी १.३) हनीफ हुसैन पिंजारी
१.४) फिरोज हुसेन पिंजारी २) फातमाबी जुम्मा पिंजारी
३) सकीना अन्वर पिंजारी ४) सुग्रा बी शेख इसामु पिंजारी
५) हजराबी शब्बीर पिंजारी ६) इमाम भिकन पिंजारी (मयत)
६.१) मन्सुरी सुपडू इमाम ६.२) महंमद इमाम पिंजारी
......अर्जदार
।। विरूध्द।।
भिला उर्फ भिकन काळू पिंजारी (मयत)
संदलबाई भिला पिंजारी (मयत)
कोणीही नाही ..... जाबदेणार

ज्या अर्थी अर्जदार क्र. १.१ ते ६.२ यांनी धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश वरीष्ठ स्तर सो. यांचे न्यायालयात दिनांक ३१/०८/२०२३ रोजी दिवाणी किरकोळ अर्ज नं. १०६६/२०२३ चा बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट कलम VIII प्रमाणे वारस दाखला मिळणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. मयत भिला उर्फ भिकन काळू पिंजारी यांच्या मालकी, कब्जे व ताबे उपभोगातील मौजे मोहाडी प्र. डांगरी ता. जि. धुळे येथील मोहाडी प्र. डांगरी ग्रामपंचायत हद्दीतील ग्रामपंचायत नं. ७६५ व ७६६ त्यासी नगर भूमापन क्र. ३७१ ही मिळकत होती व आहे. त्यांच्या निधनानंतर त्यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचा वारस दाखला मिळणेकामी मे. न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

त्या अर्थी मे. न्यायालयाने पुढील चौकशी कामकाज चालविणेकरीता दिनांक ०७/१०/२०२३ रोजी निश्चित केले आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वारस वगैरे संबंधितांना कळविण्यात येते की, याबाबत काही वाद, हरकत असल्यास धुळे येथील मे दिवाणी न्यायाधीश सो. क. स्तर यांच्या न्यायालयात उक्त निश्चित केलेल्या तारखेस वा तत्पुर्वी उपस्थित राहुन तक्रार करावी. त्याअर्थी मे. न्यायालयाने निश्चित केलेल्या तारखेपर्यंत कोणाचीही तक्रार उपस्थित झाली नाही. तर सदर अर्जाचे कामकाज पुर्ण करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सदर नोटीस मे. न्यायालयाचे शिक्क्यानिशी आमचे सहीनिशी प्रसिध्दीस दिली असे.

धुळे
दिनांक:- ११/०९/२०२३ आदेशावरुन

शिक्का

**कामगिरी कारकुन** — **दिवाणी न्यायाधिश व. स्तर, धुळे**
**अधिक्षक,** — **दिवाणी न्यायाधिश व. स्तर, धुळे**

---

प्रोसेस जमा

**ॲड. जगदिश बी. पगारे**
**निशाणी नं.- ६**

## जाहिर नोटीस

**धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश सो. व.स्तर यांचे कोर्टात**

**दि.कि. अर्ज नं.१०७०/२०२३**

रुबी एडवीन मॅसकरेन्स ...अर्जदार
वि.
कोणीही नाही ....जाबदेणार
१) ग्रेसी विक्टर ॲलन
२) ॲलीस विक्टर ॲलन ......मयत

ज्याअर्थी दि. ०१/०९/२०२३ रोजी सदरचा अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी वरील अर्जदार ही मयत ग्रेसी विक्टर ॲलन व मयत ॲलीस विक्टर ॲलन यांचे कायदेशीर वारस आहेत. तसेच धुळे महानगरपालिका हद्दीतील नगरभुमापन क्र. ३५५५ या मिळकतीचे संदर्भात वारस दाखला (हेअरशीप सर्टीफिकेट) मिळावा म्हणून सदरचा अर्ज धुळे न्यायालयात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी मे. न्यायालयाने सदर अर्जावर पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरीता चौकशी तारीख १६/१०/२०२३ ही निश्चित केलेली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वारसांना व इतर संबंधितांना या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, याबाबत कोणास काही वाद, हरकत असल्याने धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश सो. क . स्तर क्रमांक २. यांचे न्यायालयात उक्त निश्चित तारखेस वा तत्पूर्वी उपस्थित राहुन तक्रार करावी. त्याअर्थी मे. न्यायालयाने दिलेली व निश्चित केलेल्या तारखेपर्यंत कोणाचीही तक्रार उपस्थित न झाल्यास सदरकामी कोणाचीही, काहीही हरकत नाही असे गृहीत धरण्यात येवून सदर अर्जाचे कामकाज पूर्ण करण्यात येईल. त्यानंतर तक्रारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

सदर नोटीस मे. न्यायालयाच्या सही-शिक्क्यानिशी प्रसिध्दीस दिली असे.

धुळे
दिनांक : ११/०९/२०२३ आदेशावरुन

शिक्का

**कामगिरी कारकुन** — **दिवाणी न्यायालय, व.स्तर, धुळे**
**अधिक्षक,** — **दिवाणी न्यायालय, व.स्तर, धुळे**

---

**निशाणी नं.- ११**

## जाहिर नोटीस

**धुळे येथील मे. दिवाणी न्याया. सो. (व.स्तर) यांचे कोर्टात**

**दि. कि.अर्ज नं. ८३३/२०२३**

१) श्री. प्रकाश त्र्यंबक चौधरी
उ.व. ४७, धंदा- शेती, रा शांताराम नगर, नेर, ता जि धुळे
२) श्री. मोहन त्र्यंबक चौधरी
उव ६० धंदा- शेती, रा कांतीचौक नेर, ता जि धुळे
३) श्री. शांताराम उत्तम चौधरी
उव ५९ धंदा :- हमाली, रा म्हसोबा मंदिरा जवळ सुभाष नगर जुने धुळे ता. जि. धुळे
४) श्री. शिवाजी उत्तम चौधरी
उव ५३ धंदा :- हमाली, रा प्लॉट नं ३, बर्फ कारखान्याजवळ जुने धुळे ता. जि. धुळे
५) श्री. महादु उत्तम चौधरी
उव ५१ धंदा :- हमाली, रा गल्ली नं १४, सुपडु आप्पा कॉलनी जुने धुळे, ता. जि. धुळे
६) श्री. रमेश उत्तम चौधरी
उव ४७ धंदा :- हमाली, रा म्हसोबा मंदिरा जवळ सुपडु आप्पा कॉलनी सुभाष नगर ता. जि. धुळे
७) श्री. निंबा लाला चौधरी
उव ३९ धंदा :-व्यापार
८) श्री. राकेश लाला चौधरी
उव ३९ धंदा :- व्यापार
क्र. ७ रा. वरखेडे ता. जि. धुळे
९) श्रीमती चंदनबाई लाला तेली/चौधरी
उव ७० धंदा- घरकाम, रा. वरखेडे ता. जि. धुळे
१०) श्री. उज्वला प्रविण चौधरी
उव ४१ धंदा :- घरकाम, रा. गल्ली नंबर ६ माधवपुरा, तुकाराम विजय व्यायाम शाळेचे जवळ ता.जि.धुळे
११) श्री. संतोष बाबुलाल चौधरी
उव ६५ धंदा :-व्यापार, रा. कासारे ता.जि.धुळे
१२) श्री. भाईदास दगा चौधरी
उव ६५ धंदा :-व्यापार, रा. राम नगर पिपंळनेर ता. साक्री जि. धुळे .....अर्जदार
विरूध्द
कै. त्यंबक दाजी तेली (चौधरी)
(मयत २८/१०/१९९५)
कै. उत्तम दाजी तेली (चौधरी)
(मयत ३०/०१/२०२३)
कै. लाला दाजी तेली (चौधरी)
(मयत ०९/०८/२०२०)
कै. रूपाबाई बाबुलाल चौधरी
(मयत ३०/०६/२०००)
कै. मधुराबाई उर्फ नादरबाई दगा चौधरी
(मयत २५/०१/२०१६) .... सामनेवाला

१) ज्याअर्थी सर्व सामनेवाला हे ३ भाउ व २ बिहीणी हया तेली चौधरी असुन, त्यांची वडीलोपार्जीत मिळकत मौजे शिरधाणे प्र नेर येथे गट नं ५६८ चे क्षेत्र ४ हेक्टर १९ आर. आहे. सर्व सामनेवाले मयत असुन सामनेवाला क १ व २ यांच्या अनुक्रमे पत्न्या मयत आहेत. तसेच संबंधीत गटावरील मालक सदरी दर्शवलेले सर्व मयत झालेले आहेत. तसेच अनुक्रमांक ३ ची पत्नी व सर्वांचे मुल हे सर्व अर्जदार वर नमुद पत्यावर राहतात सर्व/दोनही अर्जदार हयांचे लाभात अर्ज हा अर्ज बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ च्या कलम VIII हेअरशिप सर्टीफिकेट मिळणे कामी अर्ज, हा त्यांचे वारसांनी सर्व अर्जदार हयांचे लाभात हेअरशिप सर्टीफिकेट मिळणे कामी अर्जदार सदरचा अर्ज हा दाखल करीत आहेत.

त्याअर्थी सदर प्रकरणात पुढील तारीख १६/१०/२०२३ अशी धुळे येथील मे.३रे सह दिवाणी न्यायाधीश (व) स्तर यांचे कोर्टात कोर्ट नं. यांचे समळ नेमण्यात आलेले आहेत. सदर अर्जाबाबत कोणाचाही कोणताही हरकत असल्यास त्यांनी त्यांचे म्हणणे घेवुन वरील न्यायालयात सकाळी १०:३० वाजता त्यांचे म्हणणे मांडणे कामी हजर रहावे व म्हणणे मांडावे.

वरील दिवशी व वेळेस कोणीही हजर न झाल्यास, अर्जात कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येवुन, अर्जात अर्जदार हयांचे लाभात एकतर्फी निकाल हा करण्यात येईल.

धुळे
ता. ११/९/२०२३ आदेशावरुन
येण प्रमाणे जाहिर नोटीस असे.

शिक्का

**कामगिरी कारकुन** — **दिवाणी न्यायाधिश व. स्तर, धुळे**
**अधिक्षक,** — **दिवाणी न्यायाधिश व. स्तर, धुळे**

## न्यूज कॉलम

### पिंपळादेवीच्या पाच संघांची विभागस्तर थ्रोबॉल स्पर्धेत निवड

**धुळे ।** धुळे शहराच्या मोहाडी उपनगर येथील श्री पिंपळादेवी माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालयाचे पाच थ्रोबॉल संघ जिल्हास्तरीय स्पर्धेत विजयी झाले. या पाचही संघांची विभागस्तरावरील स्पर्धेसाठी निवड झाली. क्रीडा व युवक सेवा संचालनालय, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयातर्फे धुळे जिल्हा क्रीडासंकुल येथे मनपा जिल्हास्तरीय थ्रोबॉल स्पर्धा घेण्यात आली. स्पर्धेत १४ वर्षाखालील मुले, मुली, १७ वर्षांखालील मुली व १९ वर्षांखालील मुले, मुली हे पाच संघ विजयी झाले. त्यांची विभागस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष विनायक शिंदे, मुख्याध्यापक आर. व्ही. पाटील, उपमुख्याध्यापक के. आर. सावंत, एस. एस. पाटील यांनी खेळाडूंचे अभिनंदन केले.

### पावसाने पुन्हा फिरवली पाठ

**धुळे ।** बऱ्याच मोठ्या विश्रांतीनंतर दाखल झालेला वरूणराजा जिल्ह्यात काही दिवस मुक्कामाला असेल असा अंदाज होता. मात्र, तो अंदाज फोल ठरला असून पुन्हा उन्हाळ्यासारखे वातावरण पावसाळ्यात झाले आहे. शेतकरी व शेतीनिर्भर घटकही यामुळे हवालदिल आहे. जिल्ह्यातील शेतकरी पीक विमा अग्रीम रक्कम व दुष्काळी उपाययोजनांची वाट पाहू लागले आहेत.

# यंदा बैलपोळ्यावर महागाई, दुष्काळ आणि 'लम्पी'चे सावट

**धुळे । प्रतिनिधी**

'वृषभराजा'चा पोळा सण 'बळीराजा'साठी सर्वांत महत्त्वाचा सण समजला जातो. अतिशय जिव्हाळ्याचा, पारंपरिक अन् लोकसंस्कृतीचा वारसा असलेला हा सण यंदा महागाई सोबतच लम्पीच्या प्रार्दुभाव आणि दुष्काळाच्या सावटाखाली दबला आहे. मागील वर्षीच्या तुलनेत यंदा महागाई वाढल्याने बैलांच्या सजावटीसाठी लागणाऱ्या आवश्यक साहित्यांचे दर विस ते तीस टक्क्यांनी वाढले आहे. जिल्ह्यात विविध ठिकाणी भरलेल्या आठवडे बाजारात पोळ्यासाठी विविध साहित्याची दुकाने सजली असली तरी मागील वर्षाच्या तुलनेत दुकानदारासह खरेदीदारांची गर्दी जेमतेम असल्याचे चित्र पाहवयास मिळाले.

दरवर्षी पोळा सणाला बैलांसाठी नवीन साहित्य खरेदी करून त्यांची सजावट करणाऱ्या शेतकऱ्यांनी महागाईमुळे बाजाराकडे पाठ फिरवून जुनेच साहित्य वापरण्याचा निर्णय घेतल्याने यंदा बाजारात थंड प्रतिसाद मिळत आहे. पावसामुळे खरिप पिकांची स्थिती नाजूक बनली होती; पण दोन दिवसांपासून रिमझिम पावसाने हजेरी लावल्याने शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर काहीसे हास्य फुलले आहे.

मागील काही वर्षांपासून ट्रॅक्टरचा प्रत्येक कामांसाठी उपयोग वाढल्याने बैलांची संख्या झपाट्याने कमी होऊन सणाची व्यापकताही कमी झाली. त्यामुळे साजश्रृंगाराच्या सहित्याला परिणामी शेतकऱ्यांकडून अत्यल्प प्रतिसाद मिळत असल्याचे पाहायला मिळत आहे. यंदा पावसाने दडी मारल्याने पिकांची स्थिती नाजूक असून खरीप हंगामात केलेला खर्च पदरात पडणे कठीण आहे.अनेक शेतकरी उधारी-उसनवारी करून पोळा सणासाठी बैलजोडीच्या साजाची खरेदी करत आहेत. बैलांचे शेती व्यवसायात विशेष महत्त्व असल्याने ते शेतकऱ्यांचा सोबती म्हणून ओळखला जातो. शेतकऱ्यांसाठी त्यांचे बैल वर्षभर शेतात राबतात. त्यामुळे बैलांच्या ऋणातून उतराई होण्यासाठी पोळ्याच्या दिवशी बैलांची रंगरंगोटी व सजावट करून पूजा केली जाते. पोळ्याच्या पहिल्या दिवशी बैलांचे खांदे तूप व हळदीने मळणी केले जाते. सलग दोन ते तीन दिवस बैलांना आंघोळ घालून त्यांना पुरणपोळी व नैवेद्य भरवला जातो. परंतु यंदा पिण्याच्या पाण्याचीच पंचाईत असून सर्वत्र जलसाठे कोरडे राहून बैलांना आंघोळ घालण्याचा प्रश्न उभा ठाकला आहे.




### पाऊस पडणार का?

**महाराष्ट्रात दरवर्षी बैलपोळ्याच्या सणाला पावसाची हजेरी ठरलेलीच असते. राज्यात सगळीकडेच पाऊस पडतो असे नाही पण बैलपोळ्याच्या दिवशी राज्यातील काही भागात शंभर टक्के पावसाची हजेरी लागतेच. यामुळे यावर्षीही बैलपोळ्यात पाऊस पडणार का? हा प्रश्न शेतकऱ्यांकडून उपस्थित केला जात आहे.**

### शेतकऱ्यांसाठी बैलपोळ्याचे महत्व

**बैलांप्रती कृतज्ञता व्यक्त करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी दरवर्षी सर्वत्र पोळा सण श्रावण अमावस्या दिवशी साजरा केला जातो. या दिवसाला 'पिठोरी अमावस्या' असे म्हणतात. पोळ्याच्या दिवशी वर्षभर शेतात राबणाऱ्या बैलाला शेती कामापासून आराम दिला जातो. बैलांची पूजा करून गोड धोड नैवद्य देऊन या दिवशी गावामध्ये वाजत गाजत मिरवणूक देखील काढली जाते व ज्यांच्याकडे शेती नाही व ज्या शेतकऱ्यांकडे बैले नाहीत, असे शेतकरी मातीच्या बैलांची मनोभावे पूजा करतात. त्यांना गोड नैवद्य देखील दाखवतात.**

# भाटपुरा जिल्हा परिषद शाळेची जीर्ण इमारत ठरते धोकेदायक



इमारतीचे पत्रे पडले अस्ताव्यस्त

**होळनांथे । योगेश पाटील**

भाटपुरा ता. शिरपूर येथील जिल्हा परिषद मराठी शाळेची जीर्ण इमारत धोकेदायक ठरत असून नवीन इमारतीच्या बाजूलाच असलेल्या जीर्ण इमारतीत काटेरी जुडवांसह झाडेही वाढले आहेत. तर जुने पत्रे अस्ताव्यस्त पडलेले दिसून येत आहेत.

शिरपूर तालुक्यातील भाटपुरा येथील जिल्हा परिषद मराठी शाळेच्या नवीन इमारतीच्या बाजूलाच जुनी इमारत असून सदर इमारत अत्यंत जीर्ण अवस्थेत आहे, इमारतीचे पत्रे हे इमारतीच्याआत अस्ताव्यस्त स्वरूपात पडलेले असून इमारतींमध्ये काटेरी झुडप्यांसह झाडेही वाढलेली आहेत. अस्ताव्यस्त पडलेला पत्रा, गवत व काटेरी झुडपे, तसेच पडलेला केरकचरा यामुळे जीर्ण इमारतीत घाणीचे साम्राज्य दिसून येत असून या घाणीतून सरपटणारे प्राण्यांचा वावर असू शकतो. परिणामी भाटपुरा जिल्हा परिषद मराठी शाळेची जीर्ण इमारत धोकेदायक ठरत असून तेथील काटेरी झुडपे व केअर कचऱ्याची विल्हेवाट लावणे गरजेचे असतांना याकडे शिक्षकांचे दुर्लक्ष कसे ? असा प्रश्न आता सर्वसामान्य जनतेतून विचारला जात आहे.



भाटपुरा येथील जिल्हा परिषद मराठी शाळेतील काटेरी झुडपे, वाढलेले गवत, शालेय परिसरात झालेली घाण, शालेय परिसरातच फेकलेले शिळे अन्न, बेसींग, शौचालय, स्वच्छतागृहाची असलेली दुरावस्था, जीर्ण इमारतीकडे असलेले दुर्लक्ष याकडे सदर शाळेतील शिक्षकांसह शालेय व्यवस्थापन समितीचे दुर्लक्ष दिसून येत असून याबाबत वरिष्ठ स्तरावर लक्ष देणे गरजेचे आहे. मात्र स्थानिक शिक्षकांसह वरिष्ठ अधिकारींचेही दुर्लक्ष दिसून येत असून गोरगरिबांच्या मुलांच्या जीवाशी खेळणाऱ्यांवर कारवाई होईल का ?

# साक्री येथे सेना महाराज यांची पुण्यतिथी उत्साहात साजरी




**साक्री । प्रतिनिधी**

साक्री शहर नाभिक समाज मंडळातर्फे संत सेना महाराज यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली.

साक्री शहरातून पालखी सोहळा मुख्य बाजारपेठ, सुतार गल्ली , वंजारी गल्ली, सोनार गल्ली येथून काढण्यात आला. संत सेना महाराज मंदिरात शीतल व मनोज सोमनाथ हिरे यांच्या हस्ते श्री सत्यनारायण महापूजा करण्यात आली. व संत सेना मंदिरात गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा करण्यात आला या कार्यक्रमात अध्यक्षस्थानी सरस्वताबाई शंकरराव हिरे, सोमनाथ उखाजी हिरे, विलास हिरे, प्रभाकर चित्ते, माजी जिल्हाध्यक्ष शशिकांत सुर्वे आदी मान्यवर उपस्थित होते तसेच डॉ. भूषण सुनील सुर्वे एमबीबीएस उत्तीर्ण झाला व शशांक सुनील यु. पी. एस .सी उत्तीर्ण गव्हर्मेंट सहाय्यक अधिकारी पदी नियुक्ती झाला तसेच साक्री शहर नाभिक हितवर्धक संस्थेची नूतन कार्यकारणी निवड झालेल्या त्यांचा सत्कार करण्यात आला. साक्री शहर नाभिक हितवर्धक अध्यक्ष हेमराज सुभाष ठाकरे, उपाध्यक्ष हिम्मत बापू सैंदाणे, बाळकृष्ण मुरलीधर जाधव ,भानुदास सुर्वे, साक्री शहर दुकानदाराध्यक्ष प्रवीण हिरे, राजेंद्र जाधव, विजय हिरे, महेंद्र हिरे, पांडुरंग हिरे, प्रमोद हिरे, दिनेश सुर्वे, पंकज सुर्वे, नितीन हिरे, पंकज हिरे, जितेंद्र हिरे, मोहन जाधव, नगिनलाल निकम, छोटू खोडे, नाभिक युवा मंच अध्यक्ष भैय्या सैंदाणे, अमर मंडलिक, अमोल महाले, प्रकाश जाधव, सुरेश पगारे, सुनील खोडे हेमंत महाले ,भूषण हिरे, घनश्याम सैंदाणे, समाधान अहिरे, संजय महाले, धर्मराज हिरे, सतीश सैंदाणे, दीपक महाले, आनंद सूर्यवंशी आदी सह कार्यकर्ते समाज बांधवानी परिश्रम घेतले.

# भडने येथे वानर देवाची यात्रा उत्सव साजरा



**चिमठाणे । प्रतिनिधी**

शिंदखेडा तालुक्यातील भडणे येथे श्रावण महिन्यात वानर देवाचा यात्रा उत्सव साजरा करण्यात आला.

गावातील वयोवृद्ध व्यक्तींनी सांगितले की गावात वानर आले होते. पाणी पिण्यासाठी त्यावेळेस गावातील लहान बालकांनी दगड मारल्यामुळे वानराचा मृत्यू झाला होता. यामुळे वानर मेल्यामुळे परिसरात दोन-तीन वर्षे दुष्काळ सदृश्य परिस्थिती निर्माण झाली. यावेळी गावकऱ्यांनी वानर ची मूर्ती बसवून यात्रा करून यात्रा श्रावण महिन्यात करण्याचे नियोजन ठरले त्याप्रमाणे सालाबादलाप्रमाणे श्रावण महिन्यात यात्रा उत्सव साजरा केला जातो. यामुळे या महिन्यात यात्रेदरम्यान गावात वानर व पावसाचे आगमन होते अशी आख्यायिका का आजही गावकरी ग्रामस्थ सांगतात. गावातील सरपंच गिरीश पाटील, पोलीस पाटील युवराज माळी, उपसरपंच विठोबा पाटील यांच्या हस्ते वानर देवाच्या मूर्तीची विविध पूजा करण्यात आली. यावेळी गावातील पुरोहीत राजू कुलकर्णी, ग्रामपंचायत सदस्य गोरख पाटील, हरी पाटील, भडणे येथील प्रगतशील शेतकरी विक्रम शामराव पाटील, संजय पाटील, अशोक पाटील यांच्या हस्ते विधिवत पूजा करण्यात आली. तसेच सायंकाळी गावकरी यात्रा कमिटीतर्फे शिवाभाऊ सांगवीकर यांच्या लोकनाट्य तमाशाचे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यात्रा शांततेत पार पाडण्यासाठी यात्रा कमिटीने विशेष प्रयत्न केले.

# रोटरी क्लब धुळे तर्फे नेशन बिल्डर्स पुरस्कार देऊन गुरुजनांचा सन्मान

**धुळे । प्रतिनिधी**



अनेकविध सामाजिक उपक्रमांसाठी सातत्याने अग्रेसर असलेल्या रोटरी क्लब धुळे तर्फे शिक्षक दिनाच्या निमित्ताने नुकतेच गुरुजन सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते त्यात प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक व पदवी महाविद्यालयातील ज्ञानदानाचे पवित्र कार्य करणाऱ्या गुरुजनांचा नेशन बिल्डर्स पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. जेष्ठ विचारवंत व वक्ते प्रा प्रकाश पाठक कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते त्यांच्या हस्ते पुरस्कारांचे वितरण करण्यात आले.

याप्रसंगी रोटरी क्लब धुळे चे अध्यक्ष दिपक जैन, एज्युटेक चे राहुल देवरे, सचिव विलास कोठावदे, माजी अध्यक्ष रोहित अग्रवाल, प्रोजेक्ट चेअरमन गजेंद्र पाटील, क्लब लिटरसी चेअर डॉ जगदीश गिंदोडिया आदी मान्यवर उपस्थित होते. प्रा प्रकाश पाठक यांनी पुरस्कार प्राप्त गुरुजनांचे अभिनंदन केले व भविष्यातील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या, तसेच शिक्षकांचे राष्ट्र निर्माण कार्यातील महत्त्व पूर्ण योगदान यावर सविस्तर मार्गदर्शन केले. रोटरी क्लब धुळे अध्यक्ष दिपक जैन यांनी प्रास्ताविकातून कार्यक्रमाची संकल्पना मांडली. कार्यक्रमास रोटरी क्लब धुळे पदाधिकारी तसेच पुरस्कार प्राप्त शिक्षकांचे परिवार जन मोठ्या संख्येने उपस्थित होते. गजेंद्र पाटील यांनी उत्कृष्ट सूत्रसंचालन केले व सचिव विलास कोठावदे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# पर्यावरण पूरक गणपती मूर्ती तयार करण्याची कार्यशाळा संपन्न

**पिंपळनेर ।** येथील मराठा मंगल कार्यालयात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या जनकल्याण समीती पिंपळनेर तर्फे शाडू मातीच्या गणपती मुर्त्या तयार करण्याची कार्यशाळा घेण्यात आली.आज प्लास्टर ऑफ पॅरिस या पर्यावरणाला हानिकारक मुर्त्या बाजारात असतात त्या न विकत घेता घरीच शाडू मातीच्या मुर्त्या तयार कराव्या अशी संकल्पना असून जनकल्याण समितीचे दाते उपसरपंच विजय गांगुर्डे,डॉ जितेश चौरे,रिकबचंद जैन,दिनेश पाटील,तेजस कोठावदे,यांच्या हस्ते सहभागी विद्यर्त्यांना प्रमाणपत्र देण्यात आले.

या कार्यशाळेत विविध विद्यालयातील २०० विद्यार्त्यासनी सहभाग नोंदवला,त्यांना प्रशिक्षक श्री प्रमोद गांगुर्डे सर,आणि योगेश भामरे सर यांनी प्रशिक्षित केले.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिसरातील शिक्षक,कलाशिक्षक,जनकल्याण समितीचे कार्यकर्त्यांनी मेहनत घेतली.मराठा समाज उन्नती मंडळाने कार्यालय विनामूल्य उपलब्ध करून दिले याबद्दल आयोजकांनी आभार व्यक्त केले.

# शिंगावे येथे जल जीवन मिशन अंतर्गत नळ पाणी पुरवठा योजनेचे भूमिपूजन

**शिरपूर । प्रतिनिधी**

तालुक्यातील शिंगावे येथे जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत सुधारणात्मक नळ पाणी पुरवठा योजनेचे भूमिपूजन करण्यात आले. या कामाची अंदाजपत्रकीय किंमत रुपये ६७ लाख ४८ हजार ४५२ रुपये आहे. कुणाल नगर ३० हजार लिटर, फुले नगर ९५ हजार लिटर व आदिवासी वस्ती शिंगावे ३० हजार लिटर क्षमतेच्या टाक्या बनविण्यात येत आहेत.

माजी मंत्री आमदार अमरिशभाई पटेल, शिरपूर तालुक्याचे आमदार काशिराम दादा पावरा, माजी नगराध्यक्ष भूपेशभाई पटेल, उद्योगपती व युवा नेते चिंतनभाई पटेल यांच्या शिफारशीने व मार्गदर्शनाखाली कामे मिळाली. धुळे जिल्हा परिषद माजी अध्यक्ष डॉ. तुषार रंधे, धुळे जिल्हा परिषद उपाध्यक्ष देवेंद्र पाटील, भाजपा जिल्हाध्यक्ष बबनराव चौधरी, माजी नगराध्यक्ष प्रभाकरराव चव्हाण, स्विय सहाय्यक अशोक कलाल, शिंगावे गणाचे पंचायत समिती सदस्य चंद्रकांत दामोदर पाटील, शिंगावे गावचे प्रभारी सरपंच चंद्रकांत लोटन पाटील (भुरा पाटील) या सर्वांच्या पाठपुरावाने काम मंजूर झाले. या योजनेचे भूमिपूजन धुळे जिल्हा परिषद उपाध्यक्ष देवेंद्र पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी पंचायत समिती सदस्य चंद्रकांत दामोदर पाटील, शिंगावे गावचे प्रभारी सरपंच चंद्रकांत लोटन पाटील (भुरा पाटील), ग्रा. पं. सदस्य रवींद्र पाटील, सदस्य गोविंदा थोरात, सदस्य मंजुळाबाई पवार, सदस्य कविताबाई बागुल, सदस्य मनोहर भिल, सदस्य धीरज पाटील, माजी सरपंच प्रताप आधार पाटील, प्रियदर्शिनी सूतगिरणी संचालक मधुकर सोमजी पाटील, विष्णू निंबा पाटील, विकास सोसायटी सदस्य आर. एस. पाटील, भाजपा किसान मोर्चा तालुकाध्यक्ष लोटन हिम्मतराव पाटील, विकास सोसायटी व्हा. चेअरमन शशिकांत लक्ष्मण पाटील, शिरीष मनोहर पाटील, सागर नाटु पाटील, युवराज साहेबराव भदाणे, मुरलीधर हिलाल पाटील, माजी सूतगिरणी संचालक अशोक एकनाथ पाटील, प्रा. अरुण पवार, माजी सरपंच आनंद सखाराम भिल, माजी संचालक जयवंत पाटील, जिजाबराव अर्जुन पाटील, दिलीप निंबा पाटील, नवल पंडित पाटील, संजय विश्वास पाटील, विजय प्रताप पाटील, नवनीत गोपाळ पिंगळे, ताराचंद हिरामण पाटील, शांतीलाल ढेपु पाटील, छोटू यु मोरे, मनोज डुडवे, रविंद्र पिळोदेकर, आर. आर. पाटील, राजेंद्रसिंग राजपूत, भूरेसिंग मालचे, अर्जुन महाजन, गणेश देशमुख, धनराज पाटील, शेखर चव्हाण, धनंजय पाटील, गोपाल ठाकूर, मनोज पाटील, पुष्पेंद्र पाटील, कॉलनी परिसरातील व गावातील नागरिक उपस्थित होते.



# आयुष्यात मोठे व्हायचे तर परिश्रमाची तयारी ठेवा : उपायुक्त पल्लवी शिरसाठ

**धुळे । प्रतिनिधी**

आयुष्यात जर मोठे यश संपादन करायचे असेल तर सतत आणि कठीण परिश्रमाची तयारी ठेवा असे उद्गार धुळे महापालिकेच्या उपायुक्त श्रीमती पल्लवी शिरसाठ यांनी रविवार दि.१०सप्टेंबर रोजी एस एस व्ही पी एस विज्ञान महाविद्यालयात काढले. त्या संस्थेच्या डॉ पां रा घोगरे विज्ञान महाविद्यालयाच्या गणित विभागातर्फे या वर्षांपासून सुरू करण्यात आलेल्या स्पर्धा परीक्षेसाठी गणित या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

यावेळी प्रमुख अतिथी श्री योगेश उशीरे साहेब, उप व्यवस्थापक, स्टेट बँक ऑफ इंडिया, धुळे यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी गणिताच्या माजी विद्यार्थ्यांनी दिलेली सुमारे सतरा हजार रुपये किमतीची क्रमिक तसेच स्पर्धा परीक्षेची पुस्तके मान्यवरांच्या हस्ते प्राचार्यांमार्फत महाविद्यालयास सुपूर्द करण्यात आली.याप्रसंगी शिक्षक दिनी झालेल्या कार्यक्रमाच्या बक्षिसांचे विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आले.संस्थेचे चेअरमन व धुळे ग्रामीणचे आमदार श्री. कुणालजी पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली व प्राचार्य डॉ. एम.व्ही. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमाचे आयोजन गणित विभागातर्फे करण्यात आले होते.





# जिल्हा परिषदेत पाणी, चारा टंचाईसंदर्भात आढावा बैठक

## जिल्ह्यातील अडीच लक्ष शेतकऱ्यांना 'मिड सीजन' भरपाई रोख मिळणार















धुळे। यंदाच्या हंगामात पेरणीनंतर लांबलेला पाऊस आणि जिल्ह्यावरील दुष्काळाचे सावट लक्षात घेता बारा मंडळापैकी दहा मंडळांमध्ये मीड सीझन ( मध्य हंगाम) म्हणून नोंद झाली आहे. त्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील सुमारे अडीच लक्ष पीक विमाधारक शेतकऱ्यांना २५ टक्के भरपाई रक्कम रोख स्वरूपात देण्यात येणार आहे. सदरची भरपाई रक्कम संबंधितांना तातडीने वितरित करण्याच्या सक्त सूचना धुळे जिल्ह्याचे खासदार डॉक्टर सुभाष भामरे यांनी आज येथील बैठकीत दिल्या. दरम्यान जिल्ह्यावरील दुष्काळाचे सावट लक्षात घेता सरपंच, ग्रामसेवक यांनी अधिक सजग राहून सामाजिक उत्तरदायित्वाच्या भूमिकेतून या प्रश्नाला न्याय द्यावा, पदाधिकारी म्हणून या संकटाला तोंड देण्यासाठी आम्ही देखील कटिबद्ध आहोत अशी ग्वाही धुळे जिल्हा परिषदेचे अध्यक्ष इंजिनिअर अश्विनीताई पाटील यांनी उपस्थित सरपंच ग्रामसेवक यांना दिली. संभाव्य दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर पाणीटंचाई व उपाय योजना संदर्भात खासदार डॉक्टर श्री सुभाष भामरे यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवारी सकाळी जिल्हा परिषदेच्या कै. यशवंतराव चव्हाण सभागृहात तालुक्यातील सरपंच ग्रामसेवक तसेच विविध विभागाच्या अधिकाऱ्यांची संयुक्त बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस धुळे जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा इंजिनियर सौ. अश्विनीताई पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी श्री शुभम गुप्ता,महिला बालकल्याण सभापती श्रीमती संजीवनीताई सिसोदे, माजी कृषी सभापती प्राध्यापक श्री अरविंद जाधव, माजी कृषी सभापती श्री संग्राम पाटील, जि प सदस्य श्री राम भदाणे, श्रीमती शालिनी भदाणे, श्री आशुतोष पाटील आदी उपस्थित होते.

संकलन : दिपक वाघ



# सण-उत्सवांसाठी प्रशासन सज्ज.....









धुळे । अनंत चतुर्दशी व ईद-ए-मिलाद सणाच्या पार्श्वभूमीवर मिरवणूक मार्गाची शनिवारी जिल्हाधिकारी अभिनव गोयल, पोलिस अधीक्षक संजय बारकुंड, महापालिका आयुक्त अमिता दगडे-पाटील यांनी पाहणी केली. अपर पोलिस अधीक्षक किशोर काळे, मनपा उपायुक्त डॉ. संगीता नांदूरकर, विजय सनेर, एलसीबीचे पोलिस निरीक्षक हेमंत पाटील, शहर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक आनंद कोकरे, आझादनगर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक नितीन देशमुख, शहर वाहतूक शाखेचे भूषण कोते, जिल्हा वाहतूक शाखेचे दत्तात्रय शिंदे यांच्यासह इतर अधिकाऱ्यांचा या पाहणीत सहभाग होता. विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते. श्री. गोयल म्हणाले की, पोळा, गणेशोत्सव, ईद-ए-मिलाद तसेच आगामी काळात विविध सण उत्सव साजरे करण्यात येणार आहे. या काळात कुठलीही अनुचित घटना घडून नये, यासाठी यंत्रणने आवश्यक उपाययोजना कराव्यात. गणेशोत्सव काळात ज्या मार्गावरुन मिरवणूक तसेच ज्याठिकाणी विसर्जन करण्यात येणार त्या मार्गांची संबंधित यंत्रणेने पाहणी करुन उपाययोजना कराव्यात. गणपती मंडळ परवानगीसाठी एक खिडकी योजना कार्यान्वित करावी. जिल्ह्यातील अतिसंवेदनशिल, संवेदनशिल आणि लोक वर्दळ असलेल्या ज्या भागातून मिरवणूक जाणार आहे. त्याठिकाणी कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही याबाबत पोलीस विभागाने बंदोबस्त ठेवावा. विद्युत विभागाने काळजी घ्यावी. अवैध दारुविक्री, मोकाट जनावरांचा बंदोबस्त करावा, विर्सजन ठिकाणी स्वच्छता, निर्माल्य विर्सजन, दिव्यांची व्यवस्था, बॅरिकेट्स आदी नियोजन करावे, गणेश मुर्तींच्या विसर्जनासाठी कृत्रिम हौदाची निर्मिती करावी. नदी, तलावाच्या विसर्जन ठिकाणी धोकादायक ठिकाणाची माहिती देण्यासाठी फलक लावण्याच्या सूचना जिल्हाधिकारी श्री.गोयल यांनी दिल्यात.

संकलन : दिपक वाघ